# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०२२

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२ / पौष १, १९४४ ( शके )**

---

| | | |
|---|---|---|
| (१) | ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री | |
| (३) | कामगार मंत्री | |
| (४) | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री | |
| (५) | पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता,महिला व बालविकास मंत्री | |

**प्रश्नांची एकूण संख्या - ४६**

---

### मौ.आहुर्ली (ता. इगतपुरी, जि.नाशिक) येथे दुषित पाणी पुरवठा होत असल्याबाबत

**(१) * ५२१७९ श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ. आहुर्ली (ता. इगतपुरी, जि.नाशिक) येथे दुषित पाण्यामुळे गॅस्ट्रोची साथ पसरली असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना लेखी निवेदनाद्वारे तक्रार करुनही अद्यापही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामपंचायतीने पाणी पुरवठा योजनेवर अनेक वेळा खर्च करुनही त्याचा प्रभावी उपयोग झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन दुषित पाणी पुरवठा व गॅस्ट्रोची साथ रोखण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

मौजे आहुर्ली, ता. इगतपुरी, जि. नाशिक येथे पाणी पुरवठयासाठी २ स्वतंत्र नळ योजना व ४ हातपंप आहेत. सदर स्त्रोतांची तसेच नळ पाणी पुरवठा योजनांमधून पुरवठा करण्यात येणा-या पाण्याचे नमुने उपविभागीय प्रयोगशाळा, घोटी, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, नाशिक यांचेकडे दि.२४.६.२०२२, दि.११.७.२०२२, दि.१५.७.२०२२, दि.२१.७.२०२२, दि.२४.८.२०२२, दि.२१.९.२०२२, दि.१९.१०.२०२२ व दि.१४.११.२०२२ रोजी तपासणीसाठी पाठविण्यात आले असता, तपासणीनुसार सदर पाणी पिण्यास योग्य असल्याचे अहवाल प्राप्त झाले आहेत.

आहुर्ली गावात २०२२ या वर्षात दुषित पाण्यामुळे कुठलीही गॅस्ट्रोसदृश साथीची लागण अथवा मृत्यू झालेला नाही.

(२) अंशत: खरे आहे.

आहुर्ली (ता. इगतपुरी, जि.नाशिक) येथील ग्रामस्थांनी दि. २१.६.२०२२ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

नाशिक यांचेकडे लेखी निवेदन दिले आहे. या अनुषंगाने विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत), पंचायत समिती इगतपुरी यांचेकडून प्रत्यक्ष भेट देवून चौकशी व अभिलेख्यांची तपासणी केली असता, पाणी पुरवठा योजनेवरील खर्चाबाबत कोणतीही अनियमितता आढळून आलेली नाही. त्याप्रमाणे अहवाल गट विकास अधिकारी, पंचायत समिती, इगतपुरी मार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांना सादर केला आहे.

(३) अशी बाब नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वणी-कळवण (ता. कळवण, जि.नाशिक) येथील मुळाणे घाटात झालेल्या अपघातातील मृत व जखमी मजूरांच्या वारसांना नुकसान भरपाई मिळणेबाबत

**(२) * ५१८०७ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी-कळवण (ता. कळवण, जि.नाशिक) येथील रस्त्यावरील मार्कंडेय पर्वताजवळील मुळाणे घाटात ट्रॅक्टर चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रॉलीला अपघात होवून सोळा मजूर जखमी तर सहा मजुरांचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक २ जून,२०२२ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार अपघातात मृत पावलेल्या मजूरांच्या वारसांना व जखमींना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

सदर घटनेची चौकशी केली असता, वणी ता. दिंडोरी, जि. नाशिक येथे दिनांक २/६/२०२२ रोजी सदरहू कामगार खडीकरणाचे काम करून घरी परतत असताना ट्रॅक्टर चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रॉलीला अपघात झाला. सदर अपघातात ६ मजूर व २ मुले मयत तर ७ मजूर व ७ मुले जखमी झालेली आहेत. या अपघाताबाबत वणी पोलीस स्टेशन येथे श्री. सुनील साहेबराव कापसे व श्री. अजय नवल बोरसे यांचे विरुध्द गुरनं ११९/२०२२ भादंवि क.३०४(२), ३०४(अ), २७९, ३३६, ३३७, ३३८, ४२७ मोटार वाहन कायदा क. १८४, १३०/१७७, १९०, १९२, १९४, १९६, ६६ (१)/ १९२ प्रमाणे गुन्हा दाखल होवून सदर गुन्हयाचा तपास करुन, सदर गुन्हयातील आरोपितांवर पोलीस ठाणे दोषारोप क्र. ६९/२०२२, जा.क्र. १८९५/२०२२ दिनांक २८/७/२०२२ अन्वये कोर्टात दोषारोप पाठविण्यात आले आहेत. मयत कामगारांच्या वारसांना व जखमी झालेल्या व्यक्तींच्या वारसदारांना नुकसान भरपाई देण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाहीस्तव कामगार उप आयुक्त, नाशिक यांनी प्रशासकीय न्यायाधीश, कामगार न्यायालय, नाशिक यांना दिनांक १२/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

-----------------

## राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व प्राथमिक आरोग्य केद्रांना औषधे खरेदीसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याबाबत

**(३) * ५०३५७ श्री.संजय बनसोडे (उदगीर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रासाठी लागणारी औषधे हाफकिन इन्स्टीट्यूट, मुंबई या शासन अंगीकृत संस्थेकडून खरेदी करण्याचे शासनाचे आदेश असून या संस्थेमार्फत वेळीच औषधपुरवठा होत नसल्याने रुग्णांना औषधोपचारापासून अनेकदा वंचित रहावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील २२ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व हाफकीन इन्स्टिट्यूट या संस्थेत अधिकारी-कर्मचाऱ्यांची तसेच प्राध्यापकांची रिक्त पदे तातडीने भरण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात औषधे खरेदीसाठी केरळ राज्याच्या धर्तीवर स्वतंत्र महामंडळ निर्माण करण्यात यावे असे तत्कालीन मा.सार्वजनिक आरोग्यमंत्री यांनी सन २०२१ मध्ये आदेशीत केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रिक्त असलेली पदे तातडीने भरण्याबाबत तसेच राज्यातील औषध पुरवठयासाठी स्वतंत्र महामंडळ निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही. तथापि, हाफकिन महामंडळामार्फत औषधांचा पुरवठा होण्यास विलंब झाल्यास, स्थानिक स्तरावर उपलब्ध अनुदान, महात्मा फुले जन आरोग्य योजना, सीएसआर फंड, पीएलए खात्यातून तसेच जिल्हा वार्षिक योजनेतून उपलब्ध निधीमधून तातडीची व आवश्यक औषधे व सर्जिकल्स साहित्याची खरेदी करून रुग्णसेवा सुरळीत ठेवण्यात येते.
(२) हे खरे नाही.
(३) होय.
(४) संस्थांमधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) च्या धर्तीवर महाराष्ट्र वैद्यकीय प्राधिकरण स्थापन करण्याबाबतची कार्यवाही सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयांमध्ये व्हेंटिलेटर अभावी युवतीचा मृत्यू झाल्याबाबत

**(४) * ४९४४६ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयांमध्ये व्हेंटिलेटर अभावी वणी (जि.यवतमाळ) येथील वैष्णवी राजू बागेश्वर या १७ वर्षीय युवतीचा मृत्यू झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णालयामध्ये एकूण २२२ व्हेंटिलेटरपैकी फक्त १९६ व्हेंटिलेटर कार्यान्वित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी रुग्णालयाचे अधिष्ठाता यांनी चौकशीचे आदेश दिले असून पाच सदस्यांची समिती नेमली परंतु सदर समितीने कोणालाच जबाबदार धरले नसल्यामुळे वैद्यकीय शिक्षण संचालकांनी नागपूर बाहेरच्या तीन डॉक्टरांची दुसरी समिती नेमली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन शासनाने संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली तसेच व्हेंटीलेटर दुरुस्तीसह निधी उपलब्धतेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय.
(२) रुग्णालयातील एकूण २३५ व्हेंटीलेटर पैकी १५४ व्हेंटीलेटर कार्यरत आहेत.

(३) होय.

(४) सदर प्रकरणाच्या अनुषंगाने अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर यांना त्यांच्या अधिष्ठाता या पदावरुन दिनांक ३०.०९.२०२२ पासून कार्यमुक्त करण्यात आले असून त्यांच्या विरुद्ध विभागीय चौकशी सुरु करण्याची कार्यवाही सुरु आहे.

संस्थेमधील यंत्रसामुग्री देखभाल व दुरुस्तीसाठी रु. ९१.१६ लक्ष एवढा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच (७२) यंत्रसामुग्री देखभाल व दुरुस्ती या उद्दिष्टाखाली पावसाळी अधिवेशनात रु. २.०२ कोटी एवढ्या रक्कमेची पुरवणी मागणी मंजूर करण्यात आली आहे. सदर निधीमधून रुग्णालयातील ना दुरुस्त व्हेंटीलेटर व तसेच यंत्रसामुग्रीची दुरुस्ती करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात साथरोगाचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(५) * ४९७९३ श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.फारूक शाह (धुळे शहर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यासह मुंबई, ठाणे,पूणे जिल्हयात माहे जूलै,२०२२ ते माहे ऑक्टोबर २०२२ या कालावधीत डेंग्यू, स्वाईन फ्लू, मलेरिया इ.साथरोगाचा प्रादूर्भाव वाढला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरात स्वाईन फ्लूचे १०५, मलेरियाचे ६७१, डेंग्यू ६१ रुग्ण तर ठाण्यात डेंग्यूचे १९१ आणि मलेरीयाचे १६७ रुग्ण आढळूनआले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,साथरोगाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास,साथरोगाचा वाढता प्रादुर्भात रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

मलेरिया रुग्ण ऑगस्ट २०२२ नंतर मुंबई, ठाणे आणि पुणे भागासह राज्यात कमी होताना दिसत आहेत.

डेंग्यू रुग्णांची संख्या जुलै ते ऑक्टोबर २०२२ मध्ये वाढली आहे, हे खरे आहे.

स्वाईन फ्लू रुग्ण संख्या ऑगस्ट ते सप्टेंबर २०२२ मध्ये वाढली तथापि ऑक्टोंबर २०२२ मध्ये रुग्णसंख्या कमी झालेली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे .

जुलै २०२२ ते ऑक्टोंबर २०२२ या कालावधीत मुंबई व ठाणे येथील विविध साथरोगाची परिस्थिती खालीलप्रमाणे-

| जिल्हा /म.न.पा. | मलेरिया | डेंग्यू | स्वाईन फ्लू |
|---|---|---|---|
| **मुंबई** | **२३२३** | **६८६** | **४०४** |
| **ठाणे** | **५६१** | **४५८** | **१०६१** |

(३) राज्यात मलेरिया रुग्ण उत्तरोत्तर घट होताना दिसत आहे. तथापि डेंग्यू रुग्णात वाढ होताना दिसत आहे. वाढते शहरीकरण, वातावरणातील बदलाची डासांच्या जीवनचक्रावर होणारा परिणाम, स्थलांतरचे प्रमाण आदी घटकांचा परिणाम साथरोग परिस्थितीवर होताना दिसत आहे.
(४) साथ रोग प्रतिबंधासाठी खालील उपाययोजना नियमितपणे राबविण्यात येतात .
• साथरोग नियमित सर्वेक्षण.
• नियमित कीटक शास्त्रीय सर्वेक्षण.
• साथरोग निदानासाठी व्यापक प्रयोगशाळांचे जाळे.
• साथरोग उद्रेक प्रतिबंधासाठी जिल्हा स्तरावर शीघ्र प्रतिसाद पथके कार्यरत.
• साथरोग रुग्ण - व्यवस्थापनाची सुविधा सार्वजनिक रुग्णालयात उपलब्ध
• साथरोग प्रतिबंध व नियंत्रणासाठी सर्व जिल्हयांना व आरोग्य संस्थांना औषधे व इतर साधन सामुग्रीचा पुरेसा पुरवठा.
• कीटकजन्य आजार नियंत्रणासाठी एकात्मिक कीटक व्यवस्थापन
• परिसर स्वच्छता
• कीटकनाशक फवारणी, धूर फवारणी
• गप्पी मासे यांचा वापर
• स्वाईन फ्लू प्रतिबंधकासाठी अति जोखमेच्या व्यक्तींना ऐच्छिक मोफत लसीकरण
• सरकारी - खाजगी डॉक्टरांचे आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचे साथरोग प्रतिबंध संदर्भात नियमित प्रशिक्षण
• आरोग्य शिक्षण व जनजागृती - दरवर्षी एप्रिल, मे, जून महिना हा मलेरिया व डेंग्यू जागृती महिना म्हणून साजरा केला जातो.
• राज्यातील सर्व शाळांमध्ये मलेरिया व डेंग्यू जागृती मोहिम राबविण्यात येते.
• राज्यस्तरावर साथरोग नियंत्रणासाठी महाराष्ट्र साथरोग प्रतिबंध व नियंत्रण तांत्रिक समिती कार्यरत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात "मिशन वात्स्यल्य" योजनेअंतर्गत अनुदानात वाढ तसेच "पंडिता रमाबाई व्याजमाफी" योजना अंमलात आणण्याबाबत

**(६) * ४९४९८ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय बनसोडे (उदगीर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.अशोक पवार (शिरुर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) : :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोना संसर्गाने कुटुंबातील कर्त्या पुरुषाचे निधन झाल्याने विधवा झालेल्या महिलांच्या उपजिविकेसाठी

तसेच मातृ-पितृ छत्र हरपलेल्या अनाथ बालकाच्या संगोपनासाठी शासनाने “मिशन वात्स्यल्य” योजनेअंतर्गत बालसंगोपन तसेच महिलाच्या रोजगारासाठी “पंडिता रमाबाई व्याजमाफी” योजना अंमलात आणून बालसंगोपन या योजनेअंतर्गत मिळणारी मदतीची रक्कम रु.११००/- वरुन रु.२५००/-करण्याचे तत्कालिन उप मुख्यमंत्री यांनी आश्वासित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालसंगोपन योजनेअंतर्गत अनुदानाची रक्कम वाढविणे तसेच पंडीता रमाबाई व्याज माफ योजनेअंतर्गत व्याज माफ या दोन्हीचे शासन निर्णय अद्याप निर्गमित केले नसल्याचे दि. २७ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याबाबतचे शासन निर्णय निर्गमित करण्यासंदर्भातील निवेदन महाराष्ट्र राज्य कोरोना एकल महिला पुनर्वसन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मा. मुख्यमंत्री यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, याच स्वरुपाच्या योजनेअंतर्गत उत्तर प्रदेश शासनाने बाल सेवा योजनेअंतर्गत प्रतिमहिना चार हजार रुपये, कर्नाटक शासनाने साडेतीन हजार रुपये, उत्तराखंड शासनाने वात्सल्य योजनेअंतर्गत साडेतीन हजार रुपये, मध्य प्रदेश शासनाने पाच हजार रुपये तर राजस्थान शासन देखिल पालनहार योजने अंतर्गत वाढीव अनुदान देत असल्याचे निदर्शनास आले असून त्याबाबतचा अभ्यास करुन शासन निर्णय घेणार आहे काय, असल्यास,त्याचे स्वरुप काय आहे,

(५) असल्यास, बालसंगोपन योजनेअंतर्गत अनुदानाची रक्कम वाढविणे तसेच पंडीता रमाबाई व्याज माफ योजनेअंतर्गत व्याज माफ या दोन्हीचे निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) व (५) तत्कालिन मा.मंत्री (वित्त) यांनी बालसंगोपन योजनेच्या सहायक अनुदानामध्ये अडीच हजार रुपयांपर्यंत वाढ करणेबाबत अर्थसंकल्पीय भाषणामध्ये केलेल्या घोषणेच्या अनुषंगाने मा.मंत्रीमंडळासमोर प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच, पंडिता रमाबाई स्मृती शताब्दी महिला उद्योजक योजना राबविण्याबाबत मा.मंत्रीमंडळासमोर प्रस्ताव सादर करण्याच्या अनुषंगाने संबंधित विभागांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अनेक जिल्ह्यांमध्ये अल्पवयीन मुला-मुलींची वेठबिगारीकरिता विक्री होत असल्याबाबत

**(७) * ४९७५९ श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: नाशिक,अहमदनगर, ठाणे, पालघर अशा अनेक जिल्ह्यातील आदिवासी, कातकरी समाजातील लहान मुला-मुलींना वेठबिगारीसाठी विकल्याची अनेक प्रकरणे नुकतीच निदर्शनास आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उभाडे (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील आदिवासी पाड्यातील १० वर्षाच्या मुलीचा वेठबिगारीमुळे मुत्यू झाल्याची घटना माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) तसेच, भिवंडी (जि.ठाणे) येथे दोन मुलांची तसेच जव्हार (जि.पालघर) येथील दोन आदिवासी अल्पवयीन मुलींना गहाण ठेऊन त्यांच्यांकडून नगर जिल्ह्यातील तळेगांव येथे वेठबिगारीचे कामे देवून त्याचा छळ केल्यामुळे दोन मुलींपैकी एक मुलगी बेपत्ता असल्याचे व एका मुलीचा मुत्यू झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त जिल्हयांमध्ये घडलेल्या वेठबिगारीच्या घटनांची चौकशी करण्यात आली आहे काय, त्याअनुषंगाने वेठबिगारींच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी तसेच त्यांचे मुलभुत प्रश्न सोडवून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) सदर बातमी वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती, हे खरे आहे.

सदर बालकांना अहमदनगर जिल्हयात मेंढपाळ मालकांकडे मेंढया वळण्याच्या कामाकरीता पालकांनी पाठविल्याचे तपासाअंती आढळून आले आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) भिवंडी जि.ठाणे आणि जव्हार जि.पालघर येथे आढळून आलेल्या मुलांपैकी कोणाचाही मृत्यू झालेला नाही अथवा कोणीही बेपत्ता झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) उपरोक्त घटनांची कामगार आयुक्त कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आली आहे.

संबंधित तहसिलदार यांचेमार्फत २० वेठबिगार कामगार/बाल वेठबिगार कामगारांना मुक्तता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आली आहेत. तसेच ३ कामगारांना संबंधित तहसिलदाराकडून वेठबिगार अथवा बाल कामगार म्हणून घोषित केलेले नाही.

तसेच संबंधित जिल्हादंडाधिकारी यांचेकडे तात्काळ वेठबिगार दक्षता समितीची बैठका घेऊन,महसूल विभाग,शिक्षण विभाग,आदिवासी विभाग, पोलीस विभाग यांना त्यांच्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, प्रामुख्याने शिक्षण विभागामार्फत सदर वेठबिगार मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध विकास योजनांचा पात्रतेनुसार लाभ देण्याबाबत बैठकीमध्ये सांगण्यात आले आहे.

तहसिलदार,जव्हार यांचेमार्फत भोये कुंटुंबियांस अंत्योदय योजनेचे लाभार्थी म्हणून शिधापत्रिका देण्यात आली असून, त्यांच्या दोन्ही मुलींना आदिवासी विकास विभागाच्या आश्रम शाळेत दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच पोलीस विभागामार्फत वेठबिगारीसारख्या अनुचित प्रथांना आळा घालण्यासाठी आढळून आलेल्या २३ वेठबिगार कामगारांच्या २१ मालकांविरूध्द वेठबिगार पध्दत (निर्मुलन) अधिनियम १९७६, बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम,१९८६ अनुसूचीत जाती जमाती प्रतिबंध अधिनियम, १९८९ व बाल न्याय हक्क अधिनियम, २०१५ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

वेठबिगार कामगार कुंटुंबियांच्या पुनर्वसनाकरीता मुक्तता करण्यात आलेल्या वेठबिगार कामगारांना तातडीची मदत देण्यासाठी जिल्हाधिकारी पालघर, अहमदनगर आणि नाशिक यांनी केंद्र शासनाच्या केंद्रीय सुधारित वेठबिगार पुनर्वसन योजना,२०२१ अन्वये प्रत्येकी रू.१० लक्ष इतक्या तातडीची निधीची (Corpus Fund) मागणी केंद्र शासनाकडे करण्याकरीता महसूल व वन विभागामार्फत प्रस्ताव पाठिवला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नवी मुंबईतील सी वूड्स परिसरातील आश्रमशाळेत मुलींचे लैंगिक शोषण झाल्याबाबत**

**(८) * ५१३६५ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील सी वूड्स परिसरातील चर्चमध्ये बेकायदेशीर आश्रमशाळा चालविल्या प्रकरणी एका संस्थेविरोधात ठाणे जिल्हा महिला आणि बाल विकास विभागाने माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान कारवाई केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कारवाई दरम्यान सुटका करण्यात आलेल्या मुलींपैकी चार मुलींनी संस्थाचालकाच्या विरोधात लैगिंग शोषणाची तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणाची चौकशी करुन लैंगिक शोषण करणा-या संस्थाचालकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) होय, हे खरे आहे.

नवी मुंबईतील सी वूड परिसरातील बेथेल गास्पेल ट्रस्ट या चर्चमध्ये बेकायदेशीर आश्रमशाळा चालवण्यात येत असल्याची तक्रार दि. ०५/०८/२०२२ रोजी चाईल्डलाईन वर प्राप्त झाल्यावर अध्यक्ष व सदस्य बाल कल्याण समिती, ठाणे; जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, ठाणे तसेच जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, ठाणे यांनी संयुक्तरित्या तात्काळ संस्थेची तपासणी केली. सदर संस्थेत रहात असलेल्या ४५ बालकांशी संवाद साधून त्यांचे समुपदेशन करण्यात आले आहे. तसेच सदर बालकांना बाल कल्याण समिती ठाणे यांच्या आदेशान्वये पालकांच्या ताब्यात देण्यात आलेले आहे. तपासणी दरम्यान बालकांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे संस्था चालक श्री. पास्टर येशुदास यांचे विरोधात एन. आर. आय. सागरी पोलीस स्टेशन, नवी मुंबई येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) या प्रकरणी, संस्थेत राहणा-या बालकांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे संस्थेचे संस्था चालक श्री. पास्टर येशुदास यांचे विरोधात एन. आय. सागरी पोलीस स्टेशन, नवी मुंबई येथे लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ च्या कलम ८,९,१० अन्वये तसेच बाल न्याय अधिनियम २०१५ चे कलम ७५, ८२ व भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३५४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपी सध्या पोलिस कोठडीत असून पोलीस यंत्रणेमार्फत पुढील कायदेशीर कार्यवाही व तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याबाबत**

**(९) * ५००६५ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुलांच्या तुलनेत मुलींच्या जन्माचे लिंगगुणोत्तर प्रमाण तीन वर्षापासून कमी झाल्याचे आरोग्य विभागाच्या आकडेवारीतून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, सोलापूर, सातारा, कोल्हापूर, जालना, उस्मानाबाद, बीड, वाशिम आणि बुलडाणा या जिल्ह्यांमध्ये गेल्या वर्षी लिंग गुणोत्तर प्रमाण हे विहित मर्यादित प्रमाणापेक्षा कमी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुलींचे प्रमाण कमी होण्यामागील कारणे शोधण्याकरिता शासनाने अभ्यासगट किंवा समिती नेमली आहे काय,
(४) असल्यास,राज्यात मुलींच्या जन्मदर वाढविण्यासंदर्भात राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत :**(१) हे खरे आहे.
(२) नागरी नोंदणी प्रणालीच्या अहवालानुसार सन २०२१ मध्ये राज्यातील नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगांव, अहमदनगर, सोलापूर, सातारा, कोल्हापूर, औरंगाबाद, जालना, उस्मानाबाद, बीड, वाशिम आणि बुलडाणा या जिल्ह्यांचे जन्माच्या वेळचे लिंग गुणोत्तर प्रमाण हे ९०० पेक्षा कमी आहे.
(३) सन २०१८ च्या नागरी नोंदणी प्रणालीच्या अहवालानुसार जन्मत: लिंग गुणोत्तर प्रमाण ८०० पेक्षा कमी असलेल्या, राज्यातील ०७ तालुक्यांमध्ये जन्मत: लिंग गुणोत्तर प्रमाण कमी होण्यामागच्या कारणांचा शोध घेण्यासाठी व त्यावर अभ्यास करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे.
(४) राज्यातील मुलींचा जन्मदर वाढविण्यासंदर्भात पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. तसेच राज्यात मुलींच्या जन्माचे महत्त्व पटवून देण्यासाठी टी.व्ही., रेडीओ, होर्डिंग, बॅनर, पोस्टर, रॅलीज, पथनाट्य, लोककला पथके, सामाजिक माध्यमे इ. विविध प्रभावी प्रसार माध्यमांचा वापर करुन जनतेमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राजापूर शहरानजीकच्या कोंढेतड ग्रामपंचायतीत जलजीवन मिशन अंतर्गत राबविण्यात आलेल्या नळपाणी योजनेबाबत**

**(१०) * ५४२९१ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर शहरानजीकच्या कोंढेतड ग्रामपंचायतीत जलजीवन मिशन अंतर्गत तब्बल चार वर्षापूर्वी ३६ लाख रुपये खर्चून राबविण्यात आलेल्या नळपाणी योजनेतून ग्रामस्थांना पाणी मिळत नसल्याचे दिनांक ११ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, सदरहू नळपाणी योजनेतून ग्रामस्थांना पाणी मिळत नसतानाही ठेकेदाराला मात्र संपूर्ण देयक अदा करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय;
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदरहू योजनेचे निकृष्ट काम करणाऱ्या संबधित ठेकेदारांवर कारवाई करुन सदर योजना सक्षमपणे कार्यान्वीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.
सद्यस्थितीत, योजनेतुन अंतर्भुत वाड्या वस्त्यांना सुरळीत पाणी पुरवठा होत आहे.
(२) हे खरे नाही.
सदर योजनेतुन सुरळीत पाणी पुरवठा सुरु झाल्यानंतर योजनेची यशस्वी चाचणी घेतल्यानंतर ठेकेदाराला देयक अदा करण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अनाथ मुलामुलींना सरकारी नोकऱ्यांमध्ये एक टक्का समांतर आरक्षण लागू झाल्यानंतर अवैधरित्या प्रमाणपत्र वितरीत केल्याबाबत

**(११) * ४९६८२ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनाथ मुलामुलींना सरकारी नोकऱ्यांमध्ये एक टक्का समांतर आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी आवश्यक प्रमाणपत्र देण्याचे अधिकार केवळ महिला व बालविकास विभागाच्या विभागीय उप आयुक्तांना असतानाही विभागाच्या इतर काही अधिकाऱ्यांनी आर्थिक गैरव्यवहार करुन अनाथ असल्याचे प्रमाणपत्र दिल्यामुळे अवैध प्रमाणपत्राच्या आधारे बेकायदेशीररित्या शासकीय नोकऱ्या मिळविल्याचे दिनांक ७ सप्टेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अवैध प्रमाणपत्रे शासकीय भरतीसाठी स्वीकारु नये असे महिला व बालविकास विभागाने शासनाच्या संबंधित विभागास कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

राज्यात अनाथ मुलामुलींना सरकारी नोकऱ्यांमध्ये एक टक्का समांतर आरक्षणाची तरतूद व आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी अनाथांना प्रमाणपत्र वितरीत करण्याबाबत कार्यपध्दती शासन निर्णय दिनांक २३.०८.२०२१ अन्वये विहित करण्यात आली आहे. तथापि, काही ठिकाणी नियमबाह्यरित्या प्रमाणपत्र वितरीत झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्याअनुषंगाने महिला व बाल विकास विभागाकडून दिनांक ६ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व जिल्हाधिकारी, सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर विभाग यांना अशा प्रकारे अवैध अनाथ प्रमाणपत्र देण्यात आल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच, याबाबत महसूल विभागाकडून सविस्तर अहवाल मागविण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे गोराई (ता. बोरिवली) येथील शासकीय भूखंडावर अतिक्रमण झाल्याबाबत

**(१२) * ४९४५४ श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गोराई (ता. बोरिवली) येथील स. नं. ४६,५३, ५४,५६,५७,५९ न.भू.क्र. ४९, १, ३, ५९, ८५, ८८, ९८, ९९, १८६९ व १९६० क्षेत्र ५२.१३.४२ हे. आर. (१२८.३३ एकर) स.न. २६७ पै. व २७१ पै. न.भू.क्र. १८६९ व १९६० क्षेत्र १०६.०५.५९ हे.आर. (२६२.०७ एकर) येथील सदरहू जमीन जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचे आदेश क्र. ६६/३ डी/ एल-५६९ दि. २०/०७/१९९५ अन्वये महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी) यांना भाडेपट्ट्याने मंजूर केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जमिनीवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले असून यासंदर्भात स्थानिक पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापही सदरहू जमिनीवर अतिक्रमण तसेच खरेदी-विक्रीचे व्यवहार होत असून तेथील अतिक्रमण हटविण्याबाबत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याअनुषंगाने कारवाई होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर यांना २०/०७/२०२२ रोजी तसेच मा.पर्यटन मंत्री यांना दिनांक ०१/११/२०२२ रोजी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार अतिक्रमण हटविण्याबाबत व संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) होय.
(२) होय.
(३) नाही
(४) होय.
(५) सदर निवेदनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या जमिनीचे संरक्षण करावे व झालेले अतिक्रमण निष्कासित करून अनुपालन अहवाल सादर करण्याबाबत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना कळविण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एकदरा (ता.मुरुड जि.रायगड) गावातील गोमुख पाडा भागातील पिण्याच्या पाण्याची समस्या दूर करण्याबाबत

**(१३) * ५१८५६ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एकदरा (ता.मुरुड जि.रायगड) गावातील गोमुख पाडा भागातील ग्रामस्थांना महिन्यातून केवळ एकदाच पाणी पुरवठा होत असून ग्रामस्थांवर ३५० ते ४०० रुपये खर्च करुन पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात एकदरा ग्रामपंचायतीने सातत्याने मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री, मा. पालकमंत्री, रायगड जिल्हा, जिल्हाधिकारी, रायगड, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद. रायगड आदींकडे लेखी निवेदनाद्वारे पाठपुरावा करुनही कार्यवाही होत नसल्यामुळे ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी यांचे पंचायत समिती कार्यालयावर धडक मोर्चा काढून निवेदन सादर करुनही अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एकदरा गावातील पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई विनाविलंब दूर करण्याचे दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) एकदरा ग्रामस्थांनी दि.०७.१०.२०२२ रोजी पंचायत समिती, मुरुड जि.रायगड कार्यालयास निवेदन दिलेले आहे. सदर निवेदनाच्या अनुषंगाने तात्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना गट विकास अधिकारी, पंचायत समिती मुरुड यांनी दिल्या होत्या. दि.०५.१०.२०२२ व दि.०६.१०.२०२२ रोजी एकदरा नळ पाणी पुरवठा योजनेची पाईप लाईन गळती झाल्यामुळे गायमुख पाड्यासह पुर्ण एकदरा गावास दोन दिवस पाणी पुरवठा अत्यंत कमी दाबाने सुरु होता. तथापि, ग्रामपंचायतीने तात्काळ सदर पाईप लाईन लिकेज दुरुस्ती केली व पाणी पुरवठा सुरळीत केला आहे.
(३) सदर गावातील पाणी टंचाई दूर करण्याकरीता रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांच्याकडून जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत एकदरा नळ पाणी पुरवठा योजना मंजुर झालेली असून दि.१३.१०.२०२२ अन्वये योजनेस कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**परमहंस रामकृष्ण मौनीबाबा शिक्षण संस्था (ता. चिखली जि. बुलडाणा) संचालीत सावरगांव डुकरे येथील शैक्षणिक संस्थेबाबत**

**(१४) * ५३२१२ श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परमहंस रामकृष्ण मौनीबाबा शिक्षण संस्था (ता. चिखली जि. बुलडाणा) संचालीत सावरगांव डुकरे चिखली येथे जमीन अकृषिक करण्याची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता शैक्षणिक आणि व्यावसायिक इमारती बांधल्या असून शासनाला कोणत्या ही स्वरूपात अकृषक किंवा विकास शुल्क न भरता गत ३० वर्षापासून अवैधरीत्या जमिनीचा व इमारतींचा वापर या संस्थेकडून सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास ,या प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमानुसार ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रामधील मालमत्तेवर कर आकारणी करून वसूली करणे ही ग्रामपंचायतीची जबाबदारी असल्याने त्यांनी कायदेशीर मार्गदर्शन घेऊन कर वसुली करण्याचे आदेश गट विकास अधिकारी ,चिखली यांनी क्रमांक पसंचि/ पंचायत आस्था/ १००/ २०२२कार्यालय, पंचायत समिती, चिखली दिनांक ४ ऑक्टोबर, २०२२ अन्वये आदेशित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संस्थेने सदर बांधकाम परवानगी व नियमानुकूल करणेबाबत मागणी केली असता विकास शुल्क व तडजोड शुल्क वसूलीची कार्यवाही करणेबाबत नगर रचनाकार, बुलडाणा यांनी त्यांच्या जा. क्र. मो. सावरगांव डु/ता. चिखली/ग.नं. ११७,११८/ ससंनर/ १६०० दि १२/८/२०२२ अन्वये तहसिलदार, चिखली यांना कार्यवाही करण्याबाबत सुचविलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, संस्थेने सादर केलेली माहिती अथवा कागदपत्रे दिशाभुल करणारी असल्याने सदरचे बांधकाम नियमानुकूल करण्याची शिफारस रद्द समजण्यात यावी अशी सुद्धा सूचना नगर रचना कार यांनी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५)असल्यास, याबबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन :** (१) व (२) होय, हे खरे आहे,

(३) होय, हे खरे आहे,

(४) होय, हे खरे आहे

(५) प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालय खंडपिठ नागपूर यांचेकडे रिट पिटीशन क्रमांक ७१३५/२०२२ दाखल असून, मा.न्यायालयाने अर्जदार संस्थेच्या विरोधात मा.न्यायालयाचा पुढील आदेश येईपर्यंत कारवाई न करण्याचे आदेश पारीत केले आहेत. तसेच अर्जदार यांना तडजोड शुल्क मान्य नसल्याबाबत त्यांनी सहसंचालक, नगर रचना विभाग अमरावती यांचेकडे अपील दाखल केले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**मौ.कायलारी व पाचडोंगरी (जि.अमरावती) येथे दुषित पाण्यामुळे दोन व्यक्तींचा झालेला मृत्यू**

**(१५) * ५११७८ श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट या दुर्गम, परिसरातील मौ.कायलारी व पाचडोंगरी (जि.अमरावती) या दोन गावांसाठी राष्ट्रीय पेयजल योजनेच्या माध्यमातून दीड कोटी रुपये खर्च करुन जलकुंभ बांधण्यात येऊन गावात नळाद्वारे पाणीपुरवठा सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे ५० हजार ३४० रुपये रक्कमेचे विद्युत देयक न भरल्याने विद्युत कंपनीने वीज पुरवठा खंडीत केल्याने पाणीपुरवठा बंद असल्याचे दिनांक १४ जुलै,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे गावकऱ्यांना विहिरीतून पाण्याचा उपसा करावा लागत असून ते दुषित पाण्यामुळे सदरहू गावातील तरुण शेतकरी व एक महिलेचा मूत्यू झाल्याची दुदैवी घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दुषित पाणी पुरवठा संदर्भात अन्य जलस्तोत्रांची तपासणी तसेच मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री तसेच प्रहार संघटनेने आर्थिक मदत केली असून त्याची अंमलबजावणी झाली आहे काय,
(५) असल्यास, वीज पुरवठयाअभावी बंद झालेली पाणीपुरवठा योजना पुर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) होय. हे खरे आहे.
(२) होय. हे खरे आहे.
(३) होय. मौ. कायलारी व पाचडोंगरी (जि. अमरावती ता मेळघाट) या दुर्गम परिसरात गावांसाठी राष्ट्रीय पेयजल योजनेतून पाणी पुरवठा करण्यात येत असून वीज देयक न भरल्याने वीज खंडीत करण्यात आल्याने योजनेद्वारे सुरु असलेला पाणी पुरवठा बंद पडला होता. गावामध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उद्भवलामुळे नियमीत स्त्रोता व्यतीरिक्त इतर स्त्रोताचे पाणी पिण्यासाठी वापरणार असल्यास क्लोरीन द्रावण व क्लोरीनच्या गोळया वापरून निर्जंतुक केलेले पाणी पिण्यासाठी वापरण्याच्या सुचना असतानाही पाचडोंगरी या गावालगत असलेल्या खाजगी मालकीच्या उघड्यात विहीरीचे निर्जंतुकीकरण न केलेले पाणी पिण्याकरिता वापरल्याने दिनांक ०७.०७.२०२२ रोजी अतिसाराची लागण होऊन पाचडोंगरी येथील ३ रुग्णांचा मृत्यू झाला आहे.
(४) होय.
दुषित पाण्यामुळे मृत झालेल्या मृतांच्या नातेवाईकांना पाच लक्ष रुपयांची आर्थिक मदत करण्याबाबत मा मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केली होती
(५) दिनांक ०८.०७.२०२२ रोजी विद्युत पुरवठा पुर्ववत सुरु केल्यावर योजनेद्वारे गावाला पुर्ववत पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पंडित दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेंतर्गत निधीचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१६) * ४९७३१ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती),**

**श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), अ‍ॅड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या पंडीत दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेंतर्गत राज्यातील १८ ते ३५ वयोगटातील बेरोजगार तरुण-तरुणींना प्रशिक्षण देवून रोजगार मिळवून देण्यासाठी छत्तीसगड येथील सुर्या वायर्स प्रा.लि., नाशिक येथील ध्येयपूर्वी सेवा स्वयंरोजगार प्रशिक्षण सहकारी संस्था, पुण्यातील जाईजुई चॅरिटेबल ट्रस्ट व ॲस्टर फ्लेअर ॲण्ड लेटर या चार खाजगी संस्थांची निवड करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत निवडलेल्या चारही खाजगी कंपन्यांनी कोटयावधी रुपयांचा अपहार केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१७ ते २०२१ दरम्यान सुर्या वायर्स प्रा.लि. ने अकोला, अमरावती, यवतमाळ व वर्धा या जिल्ह्यातील केवळ ५८८ लाभार्थ्यांना प्रशिक्षण देऊन त्यापैकी ४० जणांना रोजगारांची संधी उपलब्ध करुन दिल्याचे समोर आले असून सदर कंपनीला रु.२९ कोटी ४ लाख दिले जाणार असताना त्यापैकी रु.७ कोटी २६ लाख देण्यात आले असून कंपनीने रु.१६ लाख ८५ हजारांचा निधी वापरुन उर्वरित रक्कम इतर बँक खात्यात वर्ग केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या चार कंपन्यांनी बेरोजगार युवकांना अटी शर्तीनुसार प्रशिक्षण दिले नसतानाही या कंपन्यांना रक्कम वितरीत करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नवी मुंबईत उक्त योजनेंतर्गत ग्रामीण भागातील तरुणांना प्रशिक्षण देण्यासाठी निधी देऊनही प्रशिक्षण न दिल्याने सुर्या वायर्स, प्रा.लि. कंपनीवर सी.बी.डी. बेलापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी कारवाई करुन या कंपन्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करण्याचे आदेश मा.ग्रामविकास मंत्र्यांनी दिले, हे खरे आहे काय,

(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार चारही कंपनी तसेच व संबंधितांवर गुन्हे दाखल करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१), (२) हे खरे आहे.

(३) होय.

सूर्या वायर्स प्रा. लि.संस्थेने ५८८ लाभार्थींना प्रशिक्षण व ४० प्रशिक्षित लाभार्थींना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिल्याचे कळविले आहे, तथापि, परिपूर्ण कागदपत्रे सादर न केल्यामुळे सदर माहितीची पडताळणी करण्यात आलेली नाही.

सदर कंपनीला योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार रु.७,२६,२४,०८४/- निधी पहिला हप्ता वितरीत करण्यात आला आहे. सदरील निधी पैकी रक्कम रु.५,५९,८२,०००/- इतका निधी डिसेंबर, २०१७ च्या अखेर पर्यंत योजनेच्या खात्याव्यतिरिक्त अन्य खात्यावर वळविल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) नाही.

सदर कंपन्यांना योजनेच्या मार्गदर्शक/SOP सुचनानुसार निधीचा पहिला हप्ता (प्रकल्पाच्या एकूण रक्कमेच्या २५%) वितरीत करण्यात आला आहे.

(५) होय.

सूर्या वायर्स प्रा. लि. या संस्थे विरुद्ध FIR (No.०१५०) सी. बी. डी. पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

(६) होय. खरे आहे.

(७) सदर संस्थांबाबत योजनेच्या मार्गदर्शक सूचना प्रमाणे कार्यवाही अंती, सदर संस्थांना देण्यात आलेल्या निधी परत मिळविण्याबाबत पोलिस ठाण्याकडून कार्यवाही सुरु आहे.

उपरोक्त नमूद चार संस्थांच्या विरोधात नवी मुंबई येथील, सीबीडी बेलापूर पोलीस ठाण्यात FIR करण्याकरिता लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे.त्यापैकी छत्तीसगड येथील सूर्या वायर्स प्रा. लि. या संस्थे विरुद्ध FIR (No.०१५०) दाखल करण्यात आला आहे, तथापि, सूर्या वायर्स प्रा. लि. यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केलली असून न्यायालयाने लवाद नेमणूक केला आहे. तथापि, सदर लवादबाबत कार्यालयाकडून हरकत घेण्यात आली आहे.

(८) निरंक.

-----------------

**राज्यातील अंगणवाडी सेविकांच्या विविध मागण्याबाबत**

**(१७) * ५०१७२ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.संजय पोतनीस (कलिना), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.राजन साळवी (राजापूर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत राज्यातील अंगणवाडी सेविकांच्या विविध मागण्या दिर्घकालापासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य अंगणवाडी संघटनेच्यावतीने अंगणवाडी सेविकांना समान किमान कार्यक्रमानुसार मानधनाच्या रकमेत वाढ करावी, शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देऊन सेविकांना तृतीय श्रेणी व मदतनीसांना चतुर्थ श्रेणीचे वेतन व भत्ते देण्यात यावे, सेवा समाप्तीच्या रकमेत तीन पट वाढ करुन सेवानिवृत्तीच्या दिवशी कर्मचाऱ्यांना जे मानधन मिळते त्याच्या ५० टक्के रक्कम पेन्शन म्हणून देण्यात यावी, कर्मचाऱ्यांना आठ तास पूर्ण वेळ काम देऊन वेतन लागू करावे ,रिक्त जागेवर तातडीने नियुक्त्या करण्यात याव्यात,अंगणवाडी केंद्राच्या भाड्याची रक्कम तसेच दिवाळीपूर्वी एक महिन्याच्या मानधनाइतकी बोनस / भाऊबीजेची रक्कम द्यावी अश्या व इतर प्रलंबित मागण्या संदर्भात दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मुंबईतील आझाद मैदान येथे आंदोलन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गोवा राज्यात अंगणवाडी सेविकांना कामावर रुजू होताच रुपये १०,००० व मदतनिसांना रु.८,७०० मानधन दिले जात असून दोन वर्षाने त्याच्या मानधनात वाढ दिली जात असल्याचे निदर्शनास आले असल्याने त्याबाबतचा अभ्यास करुन शासन निर्णय घेणार आहे काय, असल्यास,त्याचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, दिर्घकाळ प्रलंबित असलेल्या अंगणवाडी सेविकांच्या मागण्या पूर्ण करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे नाही.

राज्यातील अंगणवाडी कर्मचा-यांकडून करण्यात येणाऱ्या विविध मागण्यांबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) अंगणवाडी कर्मचारी यांनी केलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने अंगणवाडी कर्मचारी संघटनासमवेत वेळोवळी बैठक आयोजित करुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते. त्याचप्रमाणे अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनामध्ये वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्हा परिषदेत झालेला गैरव्यवहार

**(१८) * ४९९२२ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हा परिषदेतील बांधकाम विभागात वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संगनमताने गेल्या वर्षी २ कोटी ७४ लाख रुपयांच्या सुरक्षा ठेव योजनेत गैरव्यवहार झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू गैरव्यवहारामध्ये सहभागी असलेल्या ६ जणांची विभागीय चौकशी करुन त्यांचा अहवाल माहे ऑगस्ट,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान शासनास पाठविण्यात येऊनही अद्यापही त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने संबंधीत दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) जिल्हा परिषदेतील बांधकाम विभागामार्फत उक्त प्रकरणी संयुक्त विभागीय चौकशीच्या अनुषंगाने प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात (घाटी) (जि.औरंगाबाद) उद्भवण्या-या समास्यांचे निराकरण करण्याबाबत

**(१९) * ४९५८९ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात (घाटी) (जि.औरंगाबाद) येथे रुग्णांना योग्य प्रकारे उपचार मिळत

नसून प्रसूती विभाग रुग्णालयाच्या तिसऱ्या मजल्यावर असल्याने गर्भवती महिलांची गैरसोय होत असून रुग्णांच्या नातेवाईकांना बाहेरुन औषधे विकत आणण्यास सांगणे तसेच लहान मुलांच्या वार्डात विविध प्रकारच्या समस्या असून रुग्णालयात असलेली अस्वच्छता अश्या तक्रारी एका राजकीय पक्षाच्या उपाध्यक्षांनी दि.२१ जुलै, २०२२ व १९ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद यांच्याकडे लेखी स्वरुपात दिली आहे , हे खरे आहे काय,

(२) तसेच, येथे पक्षघात (स्ट्रोक) या आजाराचे दर महिन्याला १०० पेक्षा अधिक रुग्ण उपचारासाठी येतात मात्र त्यासाठी लागणारे महागडे थ्रोम्बोलायसिस इंजेक्शनाचा तुटवडा असल्याने रुग्णांना उपचाराचा लाभ मिळत नसल्याचे माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, या रुग्णालयात येण्या-या रुग्णांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी उक्त समास्यांचे निराकरण करणे तसेच थ्रोम्बोलायसिस हे इंजेक्शन पूरक प्रमाणात उपलब्ध करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भंडारा जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीत अग्निशमन यंत्रणा बसविण्यातबाबत**

**(२०) * ५०३६४ श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयातील ४१ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात आलेली नसल्याचे माहे ऑक्टोंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारा जिल्हा रुग्णालयाला पूर्वी लागलेल्या आगीमध्ये १० चिमुकल्या बालकांना जीव गमवावा लागला असून या घटनेचे गांभिर्य लक्षात घेता शासनाने सर्व रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रांचे फायर ऑडिट करुन अग्निशमन यंत्रणा बसविण्याचे निर्देश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने निर्देश देऊनही जिल्हयातील ४१ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीत अग्निशमन यंत्रणा न बसविण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,तदनुसार यात दोषी असलेल्या संबधितावर कारवाई करणेसह आरोग्य केंद्राच्या इमारतीत अग्निशमन यंत्रणा बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

भंडारा जिल्हयामध्ये एकुण ३३ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यरत असुन त्यापैकी ३१ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये ५६ अग्निशमन यंत्रे बसविण्यात आले आहेत. ०२ प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम सुरु असल्याने इतर ठिकाणी कार्यरत असुन तेथे आग्निशमन यंत्रणा उपलब्ध नाहीत.

(२) होय हे खरे आहे.

(३) व (४)

भंडारा जिल्हयात एकुण ३३ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यरत असुन त्यापैकी ०२ प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. उर्वरित ३१ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये ५६ अग्निशमन यंत्रे बसविण्यात आले आहेत. ०२ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये अग्निशमन यंत्रणा उपलब्ध नाहीत.

सदर अग्निशमन यंत्रणा अद्यायावत व बळकट करण्याच्या दृष्टीने रु. ७२,०४,८९०/- इतके अनुदान जिल्हा नियोजन समिती , भंडारा कडून उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने**
**कामगारांना देण्यात येणारे भोजन निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(२१) * ५११९२ श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्यावतीने इमारत बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजना राबविण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगोली जिल्हयात कंत्राटदारामार्फत पुरवठा करण्यात येत असलेले भोजन निकृष्ठ दर्जाचे असून बनावट कागपत्रांच्या आधारे कामगार वाढवून मोठया प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गडचिरोली जिल्हयात कंत्राटदाराने अधिकाऱ्यांच्या संगनमताने ११ कोटी रुपयांची देयके काढून गैरव्यवहार केल्याचे माहे नोव्हेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बीड जिल्यात सदर योजनेअंतर्गत कामगारांना मध्यान्ह भोजन देत असताना कंत्राटदाराकडून निकृष्ट व अल्प प्रमाणात भोजन वाटप करण्यात येऊन कामगार सहित्य वाटपामध्ये देखील अनियमितता होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कंत्राटदार व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय. हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

हिंगोली जिल्हयात सदरील योजनेंतर्गत कामगारांना मध्यान्ह भोजन देत असतांना कंत्राटदाराकडुन निकृष्ट व अल्प प्रमाणात भोजन वाटप करण्यात येत असल्याबाबत कोणतीही तक्रार कामगारांकडुन प्राप्त झालेली नाही.

पुरवठादार संस्थेने बांधकाम ठिकाणाच्या सर्वेक्षणाअंती निवड केलेल्या बांधकामाच्या ठिकाणावरील नोंदीत व अनोंदित कामगारांना मध्यान्ह भोजन पुरवठयाबाबत संबंधित विकासक/ ठेकेदार/ आस्थापनेच्या सहमती पत्रासोबत दिलेल्या कामगाराच्या यादीस हिंगोली कार्यालयाकडून पुरवठा आदेशातील शर्ती व अटीनुसार मंजुरी देण्यात आलेली असल्यामुळे बनावट कागदपत्रांच्या आधारे कामगार वाढवून मोठया प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आलेले आहे हे म्हणणे खरे नाही.

(३) कंत्राटदाराने अधिकाऱ्यांच्या संगनमताने ११ कोटी रुपयांची देयके काढुन गैरव्यवहार केलेली माहिती ही खरी नाही, मंडळाद्वारे प्राप्त पत्राच्या अनुषंगाने नोंदीत व अनोंदित बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन योजना ही गडचिरोली जिल्हयात माहे ऑक्टोबर, २०२१ पासून राबविण्यात येत आहे. त्यानुसार माहे ऑक्टोबर, २०२१ ते माहे ऑक्टोबर, २०२२ या सदर कालावधीतील नियुक्त पुरवठादाराकडून कामगारांना वितरीत केलेल्या मध्यान्ह भोजन देयकाची रक्कम त्या दरम्यान असून त्यात कोणतेही गैरव्यवहार झालेले नाही.

(४) हे खरे नाही.

बीड जिल्हयात मध्यान्ह भोजन योजनेअंतर्गत कामगारांना मध्यान्ह भोजन देत असतांना कंत्राटदाराकडून निकृष्ट व अल्प प्रमाणात भोजन वाटप करण्यात येते हे म्हणणे खरे नाही. तसेच कामगारांच्या साहित्य वाटपामध्ये अनियमितता होत असल्याचे निदर्शनास आले हे म्हणणे ही खरे नाही.

बीड जिल्हयात मंडळाचे दिनांक ०७.०१.२०२२ रोजीच्या पुरवठा आदेशान्वये ठरवून दिलेल्या मेनुप्रमाणे व निश्चित केलेल्या प्रमाणात मध्यान्ह भोजनाचा पुरवठा केला जात आहे. तसेच मध्यवर्ती स्वयंपाकगृहात तयार होणाऱ्या अन्नपदार्थांची श्री. अॅनॅलिटीकल टेस्टींग अॅड रिसर्च लॅबरोटरी, जळगांव या प्रयोगशाळेतून वेळोवेळी तपासणी करण्यात आलेली असून स्वयंपाकगृहात तयार होणारे अन्न खाण्या योग्य असल्याचा अहवाल दिलेला आहे. बीड जिल्हयात सदरील योजनेंतर्गत कामगारांना मध्यान्ह भोजन देत असतांना कंत्राटदाराकडून निकृष्ट व अल्प प्रमाणात भोजन वाटप होत असल्याबाबत तक्रार कामगारांकडून प्राप्त झालेली नाही.

बीड जिल्हयात नोंदणीकृत बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संचाचे वाटप केले जाते. बांधकाम कामगारास सुरक्षा संच व अत्यावश्यक संचाचे वाटप हे बायोमॅट्रीक पध्दतीने केले जाते. साहित्य वाटप करतांना कामगारांचे अंगठयाचे ठसे घेतले जातात. तसेच साहित्याच्या किट सोबत कामगारांचे छायाचित्र ही घेतले जाते. ही सर्व प्रक्रिया ऑनलाईन असल्यामुळे साहित्य वाटपात अनियमितता होते हे म्हणणे ही खरे नाही. यासंदर्भात कोणतीही तक्रार कामगारांकडुन प्राप्त झालेली नाही.

(५) बीड जिल्हयात सदर योजनेंतर्गत कामगारांना मध्यान्ह भोजन देत असतांना कंत्राटदाराकडुन निकृष्ट व अल्प प्रमाणात भोजन वाटप करण्यात येऊन कामगार साहित्य वाटपामध्ये अनियमितता होत असल्याबाबत मा. आ. श्री. संदिप क्षिरसागर, विधानसभा सदस्य, बीड यांनी मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना दिनांक १७.०९.२०२२ रोजी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने कामगार आयुक्तांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे कामगार उपआयुक्त कार्यालय, औरंगाबाद येथील अधिकाऱ्यांनी चौकशी केलेली असून चौकशी अहवाल मा.आ.श्री.संदिप क्षिरसागर, विधानसभा सदस्य, बीड यांना दिनांक १९.१०.२०२२ रोजीच्या पत्रासमवेत दिनांक २१.१०.२०२२ रोजी हस्तपोच देण्यात आलेला आहे. चौकशीदरम्यान बीड जिल्हयात मध्यान्ह भोजन योजनेंतर्गत कामगारांना मध्यान्ह भोजन देत असतांना निकृष्ट व अल्प प्रमाणात भोजन वाटप करण्यात येत असल्याबाबत तसेच कामगार साहित्य वाटपामध्ये अनयिमितता होत असल्याबाबत दिसून आलेले नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कुपोषण व बालमृत्यूचे प्रमाण रोखण्याकरीता धोरण निश्चित करण्याबाबत

**(२२) * ५०७६५ श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), अॅड.राहूल कुल (दौंड), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :**
सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कुपोषण निमूर्लनासाठी राबविण्यात येणा-या योजनांवर शासनाचा कोटयावधी रुपयाचा निधी खर्च होत असूनही माहे जुलै, २०२२ या एकाच महिन्यात शुन्य ते पाच वर्ष वयोगटातील १०६३ बालमृत्यूची नोंद झाली असून यामध्ये कुपोषणामुळे होण्या-या आजारांचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, ठाणे जिल्हयातील शहापूर तालुक्यातील आदिवासी पाडयांमध्ये निदर्शनास आलेल्या एकूण ७५९ कुपोषित बालकापैकी ८५ बालके मृत्यूशी झुंज देत असून त्यातील ७ पेक्षा जास्त बालके तीव्र कुपोषणामुळे मृत झाली तसेच

पालघर जिल्ह्यात २४२७ कुपोषित बालके व बुलढाणा जिल्ह्यातील सातपुडा पर्वताच्या कुशीतील ११७७ कुपोषित बालकांपैकी १२३ बालके तीव्र कुपोषीत तसेच पुणे जिल्हयात ८९४ कुपोषित बालकापैकी ११६ तिव्र कुपोषित बालके असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कुपोषण कमी व्हावे याकरीता अंगणवाडीच्या माध्यमातून मुलांना पुरविण्यात येणारा पोषक आहार योजनेमध्ये गैरव्यवहार होत असून अंगणवाडीमधील सेविका, मिनी अंगणवाडी सेविका, मदतनीस, आदिवासी भागातील मदतनीसांची हजारो पदे रिक्त असल्याने पोषण आहार बालके व स्तनदा माता याच्यांपर्यंत पोहचत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासर्व प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील कुपोषण व बालमृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी कोणत्या कठोर उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) अंशत: खरे आहे.

आरोग्य विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनूसार माहे जुलै-२०२२ या महिन्यात ० ते ६ वर्ष वयोगटातील १०६३ बालमृत्यूची नोंद झालेली आहे. तथापि, आरोग्य विभागाकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार सदर बालमृत्यूची कारणे निमोनिया, डायरिया, जंतू संसर्ग, जन्मजात विकृती, श्वास नलिके संबंधी आजार या सारख्या आजारांमुळे झाले आहेत.

(२) माहे जुलै, २०२२ च्या मासिक प्रगती अहवालानुसार ठाणे, पालघर, पुणे आणि बुलढाणा जिल्हयांची पोषण स्थिती खालील प्रमाणे आहे.

| जिल्ह्यांची नावे | वजन घेतलेली एकूण बालके | सर्वसाधारण बालके | मध्यम कुपोषित बालके | तीव्र कुपोषित बालके |
|---|---|---|---|---|
| ठाणे | २६६२५६ | २३९३८० | २३९४६ | २९३० |
| पालघर | १७६७३७ | १३५७५८ | ३४८१३ | ६१६६ |
| पुणे | ३८७९८३ | ३६७३७९ | १८६५० | १९५४ |
| बुलढाणा | १७७६३१ | १६४७२१ | ११६९६ | १२१४ |

ठाणे जिल्ह्यात शहापूर तालुक्यात माहे जुलै,२०२२ मध्ये तीव्र कुपोषित बालकांची संख्या ८५ तर मध्यम कुपोषित बालकांची संख्या ७१० इतकी होती. तर माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये तीव्र कुपोषित बालकांची संख्या ८२ तर मध्यम कुपोषित बालकांची संख्या ६७४ इतकी होती.

सार्वजनिक आरोग्य विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार माहे जुलै, २०२२ या महिन्यात एका बालकाचा मृत्यू झाला असून तो कमी वयातील जन्म या कारणामुळे झाला आहे. माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये ५ बालमृत्यू झाले आहेत. सदर बालमृत्यू अनुक्रमे न्यूमोनिया, अननोन बाईट, कॅन्सर, ताप व न्यूमोनिया या कारणांमुळे झालेले आहेत.

(३) हे खरे नाही.

अंगणवाडी केंद्रामध्ये अंगणवाडी सेवांसाठी नोंदविलेल्या ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थी तसेच गरोदर महिला व स्तनदा माता यांना नियमीतपणे पुरक पोषण आहाराचा पुरवठा करण्यात येतो. ज्या ठिकाणी अंगणवाडी सेविकांचे पद रिक्त आहे अशा ठिकाणी त्या अंगणवाडी मदतनिसकडे अतिरिक्त कार्यभार देण्यात येतो आणि ज्या ठिकाणी अंगणवाडी मदतनिसचे पद रिक्त आहे, अश्या ठिकाणी अंगणवाडी सेविकांकडे मदतनिसचा अतिरिक्त कार्यभार देण्यात येतो आणि अतिरिक्त कार्यभार दिलेल्या कर्मचाऱ्यांकडून नियमित पुरक पोषण आहाराचा पुरवठा सुरू आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत:-

१) एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत ६ महिने ३ वर्ष वयोगटातील बालकांना, गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना THR व ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो.

२) तसेच आदिवासी प्रकल्पामध्ये भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरु असून सदर योजने अंतर्गत गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवडयातून ४ दिवस अंडी/केळी देण्यात येते. या ४ दिवसांमध्ये शाकाहारी बालकांना प्रति दिन २ केळी व मांसाहारी बालकांसाठी १ अंडे देण्यात येते.

३) तसेच राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बाल विकास केंद्र सुरु करण्यात आली आहेत. ग्राम बाल विकास केंद्रामध्ये तीन वेळचा अतिरीक्त आहार व आरोग्य खात्यामार्फत औषधोपचार करण्यात येतात.

४) राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरुन निरंतर शिक्षण वृध्दी दृष्टीकोन (ILA) समुदाय आधारित कार्यक्रम (CBE), रिअल टाईम मॉनिटरींग (ICT-RTM) व जन आंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सरपंच, उपसरपंच व संगणक परिचालकांच्या मानधनाबाबत**

**(२३) * ५०२९५ श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.यशवंत माने (मोहोळ), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासन व अखिल भारतीय सरपंच परिषदेच्या शिर्डी (जि.अहमदनगर) येथे झालेल्या अधिवेशनात सरपंच व उपसरपंच यांना मानधन म्हणून सरसकट पाच हजार रुपये देण्याची घोषणा माहे जुलै, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान तत्कालीन मुख्यमंत्री यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लहान, मध्यम आणि मोठया ग्रामपंचायती अशी वर्गवारी करुन त्या वर्गवारीनुसार मानधनाचे रकमेत फरक करुन त्यानुसार अनुदान अदा करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आल्याचे दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ग्रामपंचायतीच्या संगणक परिचालकावर मानधन विषयक माहिती संकलित करण्याची जबाबदारी सोपविण्यात येवून परिचालकांनी दरमहा मानधनाची मागणी करायची अट टाकल्याने, या मानधनाची माहिती कधी पंचायत समिती तर कधी जिल्हा परिषद व त्यानंतर कधी राष्ट्रीय स्वराज्य अभियान तर कधी बँकेत पाठविली जाणे यामुळे ताळमेळ नसल्याने मागील सहा महिन्यापासून २५ हजार सरपंच व उपसरंपच (महिला सरपंच व उपसरपंच सह) यांना मानधन देण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने घोषित केल्यानुसार, ग्रामपंचायतीच्या वर्गवारीनुसार मानधनाच्या रकमेत फरक न करता सरसकट रुपये ५ हजार मानधन दयावे तसेच मानधन रकम वाटपात सुसुत्रता आणावी अशी मागणी सरपंच व उपसरपंच परिषदेने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, तसेच राज्यातील ग्रामपंचायतीतील २७ हजार संगणक परिचालकांना मागील चार महिन्यांपासून कंपनीकडून मानधन दिले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदरहू पकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तदअनुषंगाने सरपंच, उपसरपंच व संगणक परिचालक यांचे थकित मानधन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही,
तथापि, प्रस्तुत प्रकरणी मा.मंत्री ( वित्त ) यांनी महाराष्ट्र शासनाचा २०१९-२०२० या वर्षाचा अतिरिक्त अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना त्यांनी दिनांक १८ जून, २०१९ रोजीच्या भाषणात " राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीचे औचित्य साधून पंचायतराज व्यवस्थेचा पाया असलेल्या ग्रामपंचायतीच्या सरपंचाचे मानधनामध्ये लक्षणिय वाढ करण्याचे प्रस्तावित असून सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात रुपये २०० कोटी एवढा निधी राखून ठेवण्यात येत आहे " अशी घोषणा केली आहे.
(२) हे खरे नाही.

प्रस्तुत प्रकरणी दि.३०.७.२०१९ रोजी झालेल्या मंत्री मंडळ बैठकीत महाराष्ट्र राज्यातील सर्व ग्रामपंचायतीच्या सरपंचांचे मानधन वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला असून उपसरंपचानाही मानधन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार मंत्री मंडळाच्या मान्यतेने सर्व ग्रामपंचायतीच्या सरपंचाचे व उप सरपंचाचे मानधन ग्रामपंचायतीच्या लोकसंख्येनुसार वर्गवारी करुन वाढविण्याचा निर्णय व्हीपीएम-२०१९/प्र.क्र.२५५/पंरा-३ , दि.३० जुलै, २०१९ या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.
(३) हे खरे नाही.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे वेतन ऑनालाईन पध्दतीने थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येते, त्याच पध्दतीने व त्याच प्रणालीद्वारे सरपंच व उपसरपंच यांचे मानधन देखील ऑनलाईन थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-२०१९/प्र.क्र.२५५/पंरा-३, दि.१४ ऑगस्ट, २०१९ अन्वये घेण्यात आला आहे. त्यानुसार संचालक, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान पुणे, यांच्यामार्फत ग्रामपंचायत सरपंच व उपसरपंच यांचे मानधन संगणक प्रणाली मधुन प्राप्त झाल्यानुसार दरमहा त्यांचे बँक खात्यामध्ये जमा करण्यात येत असून माहे ऑक्टोबर, २०२२ पर्यन्तचे मानधन त्यांचे बँक खात्यामध्ये जमा करण्यात आलेले आहेत.
(४) हे खरे नाही.
(५) हे खरे नाही.
आपले सरकार सेवा केंद्रात कार्यरत संगणक परिचालकांचे मानधन देणेकरीता देयक संगणक प्रणाली तयार करण्यात आली असून, सदर प्रकल्प राबविणे करीता निश्चित करण्यात आलेली रक्कम प्रत्येक ग्रामपंचायत जिल्हास्तरीय निधीला वर्ग करते व तो निधी RGSA खात्यात जमा होऊन त्यातूनच संगणक परिचालकांचे मानधन CSC-SPV या कंपनीमार्फत संगणक परिचालकांच्या कामगिरीनुसार दरमहा अदा करण्यात येते.

संगणक परिचालकांचे सप्टेंबर २०२२ पर्यन्तचे मानधन अदा करण्यात आलेले आहे. मात्र ग्रामपंचायतींनी सप्टेंबर, २०२२ नंतरची जिल्हास्तरीय निधीला जमा करावयाची रक्कम अदा न केल्याने संगणक परिचालकांचे सप्टेंबर,२०२२ नंतरचे मानधन अदा करणे शक्य झालेले नाही. ग्रामपंचायतींकडून सदर आगाऊ रक्कम जमा करुन घेण्यासाठी सातत्याने पाठपुरवा करण्यात येत आहे. सदर रक्कम जमा झाल्यानंतर संगणक परिचालकांचे थकीत मानधन तात्काळ अदा करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे भानकवाडी (ता.शिरुर, जि.बीड) येथे नळकांडी पुलाचे बांधकाम होणेबाबत**

**(२४) * ५३१४८ श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भानकवाडी (ता.शिरुर, जि.बीड) येथे झालेल्या अतिवृष्टी व परतीच्या पावसामुळे आलेल्या पुरामुळे भानकवाडी ते साळुंखेवस्ती या रस्त्यावर नळकांडी पुल नसल्याने तीन बालकांचा पुराच्या पाण्यामध्ये बुडून मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुर्घटनेच्या अनुषंगाने जिल्हा नियोजन समितीच्या व आपत्ती निवारण निधीच्या माध्यमातून, "ग्रा.मा.३६ भानकवाडी ते साळुंकेवस्ती रस्त्यावर कि.मी ०/२५० मध्ये नवीन नळकांडी पूल बांधण्याची मागणी ग्रामस्थांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सहकार मंत्री तसेच जिल्हा पालक मंत्री, बीड जिल्हा यांना निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार उक्त ठिकाणी नळकांडी पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?,

**श्री. गिरीश महाजन :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) सदर रस्त्यावर जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत नवीन नळकांडी पूल बांधण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषदेने जिल्हा नियोजन समितीस सादर केला आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार सदरचे काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**थळ (ता. अलिबाग, जि.रायगड) येथील आरसीएफ कंपनीच्या स्फोटात कामगारांचा झालेल्या मृत्यूबाबत**

**(२५) * ५०६३९ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) थळ (ता.अलिबाग जि.रायगड) येथील आरसीएफ कंपनीच्या स्फोटात चार कामगारांचा मृत्यू व तीन कामगार गंभीर जखमी झाले असल्याचे दिनांक १९ ऑक्टोंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून उक्त दुर्घटनेबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार मृत झालेल्या कामगारांच्या परिवारास तसेच गंभीर जखमींना अर्थसहाय्य देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टीलायझर्स लि., थळ,ता.अलिबाग जि.रायगड (आरसीएफ) या कारखान्यात दि.१९.१०.२०२२ रोजी झालेल्या स्फोटात ५ कामगारांचा मृत्यू व एक कामगार जखमी झाला होता.

(२) सदर दुर्घटनेची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत चौकशी करण्यात आली असून, कारखाने अधिनियमांतर्गत कारखान्याच्या भोगवटदाराविरूध्द मा.मुख्य न्यायदंडाधिकारी अलिबाग, जि.रायगड यांचे न्यायालयात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुर्घटनेमध्ये मृत पावलेल्या चार कामगारांच्या वारसांस प्रत्येकी रू.१० लक्ष इतके सानुग्रह अनुदान देण्यात आले असून,एका मृत कामगाराच्या वारसास रू. ३ लक्ष इतके अनुदान देण्यात आले असून, उर्वरीत रू.७ लक्ष इतकी रक्कम वारसांमध्ये वाद असल्याने वितरित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

तसेच जखमी कामगाराचा वैद्यकीय उपचाराचा खर्च व्यवस्थापनाने केला असून,रू.३ लक्ष इतकी आर्थिक मदत दिली आहे.याशिवाय मृत कामगारांच्या वारसांस नुकसान भरपाई कायदा,१९२३ नुसार नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कामशेत (ता.मावळ,जि.पूणे ) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये नवजात बालकाचा झालेला मृत्यू**

**(२६) * ५३४३४ श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामशेत (ता.मावळ,जि.पूणे )येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये प्रसूतीकरिता आलेल्या महिलेवर उपचार करणेसाठी डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे दिनांक ६ सप्टेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास बालकाचा मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटना घडल्यानंतर संबंधित शासकीय निवासी वैद्यकीय अधिकारी १८ तास उलटूनही प्राथमिक आरोग्य केंद्रात उपस्थित नव्हते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरोग्य प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे बालकाचा मृत्यू झाल्यामुळे संबधित वैद्यकीय अधिकारी यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे अशी मागणी नागरिकाकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करुन त्यानुसार यासंदर्भात करावयाची उपाययोजना तसेच जबाबदार वैद्यकीय अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

रात्र पाळीचे वैद्यकीय अधिकारी त्यांचे कामकाजाचे वेळेत साधारणत: ८ तास अनुपस्थित होते.

(३) निलंबनाची मागणी केलेली नाही. तथापि, दि.०९.०९.२०२२ रोजीचे मयत बाळाचे वडील श्री. प्रदीप खंडू कुडले व ग्रामपंचायत, खडकाळा, ता. मावळ यांनी संबंधित वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांचेवर कडक कारवाई करुन संबंधितांना बडतर्फ करण्याची मागणी केलेली आहे.

(४) मुख्य कार्यकारी, अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी त्यांच्या दि.०७.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये त्रिस्तरीय चौकशी समिती नियुक्त केलेली होती. त्यानुसार चौकशी समितीने चौकशी अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांना सादर केला आहे. संबंधितांवर महाराष्ट्र नागरी सेवा, (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये कारवाई करण्याचे प्रस्तावित असून त्याबाबतची कार्यवाही उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे यांचेस्तरावरुन सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जनआरोग्य योजने अंतर्गत आयुष्यमान कार्ड न मिळाल्यामुळे**
**गरीब लाभार्थी औषधोपचारापासून वंचित असल्याबाबत**

**(२७) * ५४३११ श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.राजु पारवे (उमरेड), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.सहसराम कोरोटे (आमगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत औषधोपचार मिळण्याकरता पात्र व गरजू असलेल्या ४ लाख १७ हजार लाभार्थी आयुष्यमान आरोग्य कार्ड न मिळाल्यामुळे औषधोपचाराचापासून वंचित असल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सुरू केलेल्या योजनेचा लाभ तळागाळातील नागरिकांना मिळावा व या योजनेपासून कोणीही लाभार्थी वंचित राहू नये म्हणून मुख्याधिकारी,जिल्हा परिषद यांना शंभर टक्केचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पात्र व गरजू लाभार्थींना आयुष्यमान आरोग्य कार्ड न मिळाल्यामुळे औषधोपचारापासून वंचित राहिल्या प्रकरणाची शासनाने चौकशी करून त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही,

(२) शासनाने सुरू केलेल्या योजनेचा लाभ तळागाळातील नागरिकांना मिळावा व या योजनेपासून कोणीही लाभार्थी वंचित राहू नये म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी यांनी राज्यातील सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना दिनांक ३०.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सुचीत केले आहे.

आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यांना आयुष्यमान कार्डाचे वाटप लवकरात लवकर करण्यासाठी विशेष मोहिमेअंतर्गत प्रयत्न सुरु आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील बचत गटांची देयके प्रलंबित असल्याबाबत**

**(२८) * ४९५९७ अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), अॅड.अशोक पवार (शिरुर), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव), श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडीत येणा-या मुलांना तसेच गर्भवती अथवा स्तनदा माता यांना घरपोच ताजा सकस आहारांचा पुरवठा करणा-या महिला बचत गटांना मागील दहा महिन्यांपासून देयके अदा करण्यात आले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र व राज्य शासनाकडून त्यासाठी ५०-५० टक्के निधी वितरीत करण्यात येत असून सध्या शासनाकडे ९० कोटीचा निधी उपलब्ध असताना बचत गटांच्या महिलांना महिला व बाल विकास विभागाच्या आयुक्त कार्यालयात वारंवार जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाने बचत गटाच्या खात्यावर थेट निधी वर्ग करण्याची प्रणाली माहे डिसेंबर, २०२१ मध्ये अनुसरण्यास राज्याला सांगितले असतानाही तांत्रिक कारण देवून सदर प्रणाली कार्यान्वित झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील बचत गटांची प्रलंबित देयके तातडीने अदा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१), (२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाने माहे डिसेंबर, २०२१ मध्ये SNA (Single Nodal Agency) प्रणाली सुरू करण्याबाबत कळविले होते. माहे मार्च, २०२२ पर्यंत पुर्वीच्या पद्धतीने देयके अदा करण्याबाबत शिथीलता देण्यात आलेली होती. त्यानुषंगाने माहे मार्च, २०२२ पर्यंतची देयके पुर्वीच्या पद्धतीने अदा करण्यात आलेली आहेत.

माहे एप्रिल, २०२२ पासून नविन SNA प्रणाली कार्यान्वित करण्यात येत आहे. त्यानुसार केंद्र शासनाच्या SNA (Single Nodal Agency) प्रणाली नुसार माहे एप्रिल, २०२२ पासून पोषण आहाराची देयके अदा करण्यासाठी प्रथम राज्यस्तरावर Single Nodal Account उघडणे, तसेच जिल्हास्तरावर व प्रकल्पस्तरावर योजनानिहाय स्वतंत्र Account उघडणे आवश्यक आहे. तसेच सर्व पुरवठाधारक महिला बचत गटांचे Vender Registration करणे, Vender Registration करण्यासाठी महिला बचत गटांनी पॅन कार्ड, बँक अकाउंट, जी.एस.टी नंबर, Email ID, Phone Registration इ. कागद पत्र प्रकल्प कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. तसेच, पुरवठाधारक बचत गटांचे Account SNA प्रणालीमध्ये मॅप करणे इ. प्रक्रिया पार पाडावी लागत असल्याने त्यास काही कालावधी लागत आहे.

पुरवठाधारकांना आयुक्तालयात येण्याची कोणत्याही प्रकारची आवश्यकता नाही. सर्व पुरवठाधारक बचत गटांचे Vender Registration करणे तसेच त्यांचे Account SNA प्रणालीमध्ये मॅप करणे इ. प्रक्रिया जिल्हास्तरावर व प्रकल्पस्तरावर होत आहे.

आहारपुरवठा देयकाकरिता जिल्हास्तर/ प्रकल्पस्तरावरुन निधी मागणीचा (Limit Set) प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून २४ तासाच्या आत आयुक्तालयस्तरावरुन Limit Set करुन देण्यात येत आहे व त्यानंतर संबंधीत बचत गटांच्या खात्यावर तीन दिवसात रक्कम जमा होत आहे.

बचत गटाच्या देयकांसाठी रु. ९० कोटी निधी राखीव ठेवण्यात आला असून त्यापैकी रु.६० कोटी निधी जिल्हास्तर/ प्रकल्पस्तरावर बचत गटांच्या खात्यावर जमा करण्यासाठी SNA प्रणालीद्वारे जमा करण्यात आलेला आहे.

जिल्हास्तर व प्रकल्पस्तरावरुन निधी मागणीचे (Limit Set) प्रस्ताव जस-जसे प्राप्त होत आहेत त्याप्रमाणे प्रस्ताव पारित करुन निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाघोली (जि.पुणे) येथील ‘सोलासिया’ सोसायटीच्या**
**मलनिसारण टाकीत पडून कामगारांचा झालेला मृत्यू**

**(२९) * ५४४०० श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघोली (जि.पुणे) येथील ‘सोलासिया’ सोसायटीच्या मलनिसारण टाकीत पडून तीन कामगारांचा मृत्यू झाला असल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वीही पुणे जिल्ह्यातील लोणी काळभोर येथे चार कामगारांचा टाकी सफाई दरम्यान मृत्यू होवून अद्यापही त्यांच्या कुटुंबियांना कोणतीही मदत मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदर मृत कामगारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय, हे खरे आहे.

दोन कंत्राटी कामगारांचा तसेच या कामगारांना वाचविण्याच्या हेतूने सोसायटीतील वाहनांची साफसफाई करणारा व्यक्ती मदतीसाठी टाकीत उतरला असताना त्याचा देखील मृत्यू झाला.

(२) अंशत: खरे आहे.

लोणी काळभोर या ठिकाणी इमारत मालक, श्री. भिमाजी काळभोर यांनी दि. १३/४/२०२२ रोजी संबंधितांस प्रत्येकी रु.२.५०लाख याप्रमाणे एकूण रु.१०.०० लाख इतकी रक्कम अदा केली आहे. तथापि, मालकाने संपूर्ण नुकसान भरपाई न दिल्याने त्यांचे मिळकतीवर बोजा चढविण्यात आला. या कारवाईस इमारत मालकाने मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल करून आव्हान दिलेले आहे. सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. या घटनेतील एक मयत व्यक्ती श्री. सिकंदर कजबे यांच्या वारसास जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून रू.२.०० लाख देखील अदा करण्यात आलेले आहेत.

(३) सोलासिया सोसायटी, वाघोली, पुणे येथील अपघात प्रकरणी मृत कामगारांच्या कुटुंबास उक्त सोसायटीने प्रत्येकी रुपये १० लाख नुकसान भरपाई अदा केलेली आहे.

तसेच लोणी काळभोर, ता. हवेली, जि. पुणे या प्रकरणी इमारत मालक, श्री. भिमाजी काळभोर यांनी उक्त क्रमांक २ मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित कामगारांना प्रत्येकी रु.२.५० लाख याप्रमाणे एकूण रु.१०.०० लाख इतकी रक्कम अदा केली आहे. त्याचप्रमाणे मयत श्री. सिकंदर कजबे यांच्या वारसास जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून रू.२.०० लाख देखील अदा करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील ग्रामीण व शहरी भागातल्या आशा सेविका व गट प्रर्वतक यांच्या प्रलंबित मागण्यांची पूर्तता करण्याबाबत**

**(३०) * ५०२७७ श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण व शहरी भागातल्या ७२ हजार आशा सेविकांनी व ४ हजार गटप्रवर्तक यांनी कोरोनाच्या काळात आरोग्य सेवा देण्याबाबत महत्त्वाची भूमिका बजावली असल्याने त्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जासह त्याअनुषंगाने इतर फायदे मिळावेत तसेच इतर विविध प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी दि. ११ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मुंबईतील आझाद मैदानात आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांच्या मागण्यांचे सविस्तर निवेदन महाराष्ट्र राज्य आशा व गट प्रवर्तक कर्मचारी कृती समिती संघटनेने मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य, आरोग्य सेवा संचालक, तसेच कामगार आयुक्त यांच्याकडे दिनांक २२ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली व वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत : (**१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) आशा व गटप्रवर्तक यांच्या मागण्यांची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नंदुरबार तसेच मेळघाट या आदिवासी भागात बालमृत्यू व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याबाबत**

**(३१) * ४९६२१ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यात कुपोषण व अपुऱ्या वैद्यकीय सेवांअभावी मागील ८ महिन्यात ८६ बालकांचा मृत्यू तसेच धारणी, चिखलदरा तालुक्यात (जि.अमरावती) एप्रिल ते जून २०२२ या कालावधीत ० ते ६ वर्ष वयोगटातील ५३ बालकांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेळघाटात पावसाळयाच्या दिवसांत कुपोषित बालके, गर्भवती तसेच स्तनदा मातांना बालरोग आणि स्त्रीरोग तज्ञांची सेवा उपलब्ध करून देण्यासाठी नजीकच्या जिल्ह्यांमधून १५ दिवसांच्या कालावधीसाठी नियुक्त्या करण्यात आलेले तज्ञ बऱ्याचवेळा अनेक ठिकाणी पोहचत नाहीत किंवा दोन-तीन दिवस हजेरी लावून निघून जातात अशा तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, हे ही खरे काय,

(३) असल्यास, मेळघाट तसेच नंदुरबार परिसरातील आदिवासींच्या कुपोषणाचे कारण डॉक्टरांच्या रिक्त जागा असल्याचे या प्रकरणाची सुनावणी दरम्यान उच्च न्यायालयात विधिज्ञ मार्फत भूमिका मांडल्यानंतर वैद्यकीय शिक्षण विभागाने वर्ग-अ अंतर्गत येणाऱ्या विशेषज्ञाच्या १७८६ जागांपैकी तब्बल १११२ जागा रिक्त असल्याचे मान्य केले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रिक्त जागा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यास परवानगी देत नसल्याची माहिती संचालनालयाच्या अधिकाऱ्यांनी दिली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मेळघाट तसेच नंदुरबार येथे बालरोगतज्ञ, स्त्रीरोग तज्ञ तज्ञांची कायमस्वरूपी नेमणूक करणेसह कुपोषण तसेच बालमृत्यू रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.
तथापि, सदर बालमृत्यू प्री-मॅच्युरिटी, ॲस्फीक्झिया, जंतुसंसर्ग, न्युओनॅटल जॉडीस, जन्मजात व्यंग, कमी वजनाची बालके, अपघात, न्युमोनिया, Sudden Infant Death Syndrome (SIDS) या कारणांमुळे झालेले आहेत.
(२) हे खरे नाही.
विशेषज्ञ हजेरी लावून निघून जात असल्याबाबतची तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) हे अंशत: खरे आहे.
मेळघाट परिसरातील उपजिल्हा रुग्णालय, धारणी, ग्रामीण रुग्णालय, चिखलदरा व ग्रामीण रुग्णालय, चुरणी येथील वैद्यकीय अधिक्षक (एस-२३) ची प्रत्येक १ या प्रमाणे ३ पदे भरलेली आहेत. मेळघाट परिसरात वैद्यकीय अधिकारी गट-अ (एस-२३) संवर्गामध्ये विशेषज्ञाची पदे मंजुर नाहीत. तथापि, नंदुरबार जिल्ह्यामध्ये गट-अ (एस-२३) ची एकूण ५० पदे मंजूर असून त्यापैकी १२ पदे भरलेली असून ३८ पदे रिक्त आहेत. तसेच मेळघाट परिसरात राज्यस्तरावरील व जिल्हापरिषद स्तरावरील वैद्यकीय अधिकारी गट-अ (एस-२०) यांची एकूण २७ मंजूर पदे असून त्यापैकी १९ पदे भरलेली व ८ पदे रिक्त आहेत. तसेच नंदुरबार जिल्ह्यामध्ये राज्यस्तरावरील व जिल्हा परिषद स्तरावरील गट-अ (एस-२०) यांची एकूण १२१ पद मंजूर असून त्यापैकी ७० पदे भरलेली व ५१ पदे रिक्त आहेत.
(४) हे खरे नाही.
(५) बालरोग तज्ञ, स्त्रीरोग तज्ञांची पदे कायमस्वरुपी भरण्याची प्रक्रिया लोकसेवा आयोगामार्फत तसेच विभागीय पदोन्नतीद्वारे सुरु आहे. शिवाय सद्यस्थितीत मेळघाट भागात राज्यस्तरावरुन ग्रामीण रुग्णालय/ प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर १५ दिवसाकरीता चक्राकार पध्दतीने बालरोग तज्ञ व स्त्रीरोग तज्ञ यांच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**फांगुळगव्हाण (ता. इगतपुरी, जि.नाशिक) येथील ग्रामस्थांना पाण्यातून विषबाधा झाल्याबाबत**

**(३२) * ५२१८० श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) फांगुळगव्हाण (ता. इगतपुरी, जि.नाशिक) येथील ४० ग्रामस्थांना पाण्यातून विषबाधा झाल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या संबंधीतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.
फांगुळगव्हाण (ता. इगतपुरी, जि.नाशिक) येथील सर्व ग्रामस्थांना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेअंतर्गत नळाद्वारे नियमित शुद्ध पाण्याचा पाणी पुरवठा करण्यात येतो. मात्र काही ग्रामस्थांनी नळाद्वारे पुरविण्यात येणा-या पाण्याऐवजी नोंदणीकृत स्त्रोत नसलेल्या सार्वजनिक विहिरीतील पाणी पिण्याकरीता वापरल्यामुळे माहे आक्टोबर,२२ व नोव्हेंबर, २०२२ दरम्यान एकूण ५८ ग्रामस्थांना (पुरूष-२४ व महिला-३४) गॅस्ट्रोसदृश आजाराचा त्रास झाला होता. सदर सार्वजनिक विहिर नोंदणीकृत स्त्रोत नसल्यामुळे सदर विहिरीतून पाणी पिण्यासाठी वापरण्यात येवू नये, अशा सूचना ग्रामस्थांना देण्यात आल्या होत्या. बाधित लोकांच्या शौचाचे नमुने तपासले असता, त्यामध्ये व्हिब्रिओ कॉलराचे जिवाणू आढळून आले. सार्वजनिक विहिरीतील तसेच बाधितांच्या घरातील पाणी नमुना तपासला असता, तो पिण्यास अयोग्य असल्याचे आढळून आले आहे.

(२) जिल्हा स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक, जिल्हा आरोग्य अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता) व इतर जिल्हा स्तरीय अधिकारी यांनी वेळोवेळी फांगुळगव्हाण येथे घटनास्थळी भेटी देवून मार्गदर्शन केले व साथरोगाबाबत निष्कर्ष काढण्यात आले. त्यानुसार संबंधित ग्रामसेवक, आरोग्य सेवक व आरोग्य सहाय्यक यांचेविरुद्ध खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयातील (डफरीन) नवजात बालंकाचा अतिदक्षता (एस.एन.सी.यु) विभागामध्ये व्हेंटिलेटरचा स्फोट होऊन झालेला मृत्यू**

**(३३) * ४९४४७ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयातील (डफरीन) नवजात बालकांच्या अतिदक्षता (एस.एन.सी.यु) विभागामध्ये शिलर हेल्थकेअर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने पुरविलेल्या व्हेंटिलेटरचा शॉट सर्कीटमुळे आग लागून स्फोट झाल्यामुळे एका नवजात बालकाचा मृत्यू व आणखी एका बालकाची प्रकृती गंभीर असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या कंपनी व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे,
अमरावती जिल्हयातील स्त्री रुग्णालयाच्या (डफरिन) एस.एन.सी.यु.विभागात दि.२५ सप्टेंबर, २०२२ रोजी व्हेंन्टीलेटरचा स्फोट झाला हे खरे आहे, तथापि, त्यामध्ये एकाही शिशूचा मृत्यू झालेला नाही.
सदर एस.एन.सी.यु. विभागात उपचार घेत असलेल्या बालकांना इतरत्र स्थलांतरीत करण्यांत आले. त्यापैकी विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती येथे स्थलांतरीत करण्यांत आलेल्या एका बालकाचा २५.९.२०२२ रोजी Septicaemia with low birth weight with prematurity (Approx.३४ weeks) with respiratory distress syndrome या आजाराने मृत्यू झाला.
(२) चौकशी अहवालात अधिकारी व कर्मचारी यांनी योग्य कार्यवाही केल्याचे दिसून आले. सदर प्रकरणी उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांनी तत्परता दाखवून सर्व बालके सुखरुप बाहेर काढली. तसेच त्यांच्यावरील उपचारासाठी पर्यायी व्यवस्था केली. आवश्यकतेनुसार त्यांना संदर्भ सेवा देण्यांत आली. त्यामुळे अधिकारी व कर्मचारी यांचेवर कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही. मे.शिलर या कंपनीने पुरवठा केलेल्या सर्व व्हेंन्टीलेटरचा वापर थांबविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. तसेच उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला स्तरावर समिती गठीत करण्यांत आली असून कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**घाटव (ता.रोहा, जि.रायगड) येथील एक्सेल इंडस्ट्रिज या रासायनिक कंपनीत लागलेल्या आगीबाबत**

**(३४) * ४९८८३ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटाव (ता.रोहा, जि रायगड) येथील औद्योगिक वसाहतीमधील किटकनाशक बनविणाऱ्या एक्सेल इंडस्ट्रिज लि. या रासायनिक कंपनीत स्फोट होऊन चार कामगारांचा मृत्यू होवून अनेक कामगार गंभीर जखमी झाल्याची घटना दिनांक ११ सप्टेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कंपनी व्यवस्थापनाने कामगारांच्या सुरक्षेबाबत कोणतीच ठोस उपाययोजना केली नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार याकडे दुर्लक्ष करणाऱ्या कंपनी व्यवस्थापनाविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, मृत व जखमी कामगारांच्या कटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) मे.एक्सेल इंडस्ट्रीज लि., प्लॉट नं.११२, २०/१, ओएस-२, ता.रोहा जि.रायगड या कारखान्यात दि.१०.९.२०२२ रोजी लागलेल्या आगीत दोन कामगार जखमी झाले होते. त्यापैकी एका कामगाराचा वैद्यकीय उपचारादरम्यान दि.९.१०.२०२२ रोजी मृत्यू झाला आहे.

(२) कामाची सुरक्षित पध्दत न वापरल्याने अपघात घडलेला आहे, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, कारखाना व्यवस्थापनाने कामगारांच्या सुरक्षिततेसाठी विविध उपाययोजना केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) सदर घटनेची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत चौकशी करण्यात आली आहे चौकशीदरम्यान आढळून आलेल्या नियमभंगाबाबत कारखान्याच्या भोगवटादाराविरूध्द मा. मुख्य न्यायदंडाधिकारी अलिबाग, जि. रायगड यांचे न्यायालयात कारखाने अधिनियम,१९४८ च्या कलम ७-A (२) (a) नुसार फौजदारी खटला दाखल करण्यात आला आहे.

(४) कारखाना व्यवस्थापनाने मृत कामगाराच्या वारसास सानुग्रह अनुदानापोटी रू. २७ लक्ष इतकी रक्कम दिली असून मृत कामगाराचा वैद्यकीय व इतर आर्थिक मदतीपोटी रू.४४ लक्ष इतका खर्च केला आहे.

तसेच मृत कामगार हा राज्य कामगार विमा योजनेतर्गत नोंदणीकृत कामगार असल्याने, त्यांच्या वारसांस राज्य कामगार विमा मंडळ यांचेकडून नुकसान भरपाई प्रस्तावित आहे.

जखमी कामगाराचा वैद्यकीय उपचाराचा खर्च कारखाना व्यवस्थापनाने केला आहे. तसेच जखमी कामगारास कोणतेही अपंगत्व आलेले नसून, तो कारखान्यात कामावर पुर्ववत रूजू झाला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तारापूर (जि.पालघर) येथील औद्योगिक वसाहतीमधील भगेरीया इंडस्ट्रीज या रासायनिक कारखान्यात झालेल्या स्फोटाबाबत**

**(३५) * ४९५२८ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर (जि.पालघर) येथील औद्योगिक वसाहतीमधील भगेरीया इंडस्ट्रीज या रासायनिक कारखान्यात स्फोट होवून दोन कामगारांचा मृत्यू व १३ कामगार गंभीर जखमी झाल्याची घटना दिनांक २६ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, मृत व जखमी कामगारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) मे.भगेरिया इंडस्ट्रीज लि.,प्लॉट नं.डी-१७, एमआयडीसी तारापूर,बोईसर ता.पालघर जि.पालघर या कारखान्यात दि.२६.१०.२०२२ रोजी स्फोट होऊन तीन कामगारांचा मृत्यू व १२ कामगार जखमी झाले आहेत.
(२) सदर प्रकरणाची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत चौकशी करण्यात आली असून, कारखाने अधिनियम,१९४८ चे कलम ७-A(२) (a) व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ चे नियम ६५ (३) (iv) च्या तरतुदींनुसार कारखान्याच्या भोगवटादाराविरूध्द फौजदारी खटला दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सुध्दा तपसणी केली असून, सदर कारखान्यातील गॅमा ॲसिड चे उत्पादन बंद करण्याबाबत आदेश दिलेले आहेत.तसेच बोईसर पोलीस ठाणे,ता.जि. पालघर यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ अन्वये अकस्मात मृत्यूची नोंद घेतली आहे.
(३) कारखाना व्यवस्थापनाने स्फोटात मृत झालेल्या ३ कामगारांच्या वारसांस नुकसान भरपाई देण्यासाठी कामगार न्यायालय, ठाणे येथे खालीलप्रमाणे रक्कम जमा केल्या आहेत.
१. राम गोपाल सिसोदिया-रू.१५,५०,१७५/-
२.सिकंदर कुमार गोस्वामी- रू.१८,८१,२७५/-
३.पंकज यादव-रू.१९,७७,९५०/-

कारखाना व्यवस्थापन आणि कंत्राटदारामार्फत ३ मृत कामगारांच्या वारसांस रू.१४,०२,०००/- इतकी रक्कम सानुग्रह अनुदानापोटी देण्यात आली आहे.
तसेच व्यवस्थापनाने जखमी कामगारांचा वैद्यकीय उपचाराचा खर्च रू.१९,१६,११७/- इतका केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यात पीसीव्ही लस पुरेश्या प्रमाणात उपलब्ध करण्याबाबत

**(३६) * ५०४११ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) न्युमोनिया या आजारापासून संरक्षण करण्यासाठी ९ महिन्यांपर्यंतच्या बालकांना न्युमोकोकल कॉन्ज्युगेट लस (पीसीव्ही) देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील शहरी तसेच ग्रामीण भागात गेल्या दिड ते दोन महिन्यांपासून ही लस उपलब्ध होत नसल्यामुळे हजारो बालके या लसीपासून वंचित असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,
(३) असल्यास, ठाणे जिल्ह्यात सदर लस उपलब्ध न होण्यामागील कारणे काय आहेत,
(४) असल्यास, ठाणे जिल्हयात पीसीव्ही लस पुरेश्या प्रमाणात उपलब्ध व्हावी यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये पीसीव्ही लसीचा साठा कमी प्रमाणात प्राप्त झाल्यामुळे लसीकरण कमी झाले आहे. तथापि, ऑक्टोबर, २०२२ या महिन्यात लसींचा साठा पुरेश्या प्रमाणात प्राप्त झाल्यामुळे त्या महिन्यात ३०,८१८ इतक्या बालकांना लस देण्यात आली आहे. ऑक्टोबर,२०२२ अखेर ठाणे जिल्ह्यात २५,४४८ इतका लसींचा साठा शिल्लक होता.

(३) व (४) नियमित लसीकरण कार्यक्रमांतर्गत पीसीव्ही लसीचा नव्याने समावेश करण्यात आला आहे. केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन लस उपलब्ध करुन घेण्यात येते. लस उपलब्धतेनुसार जिल्ह्यांना पुरवठा केला जातो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### वापटी (ता.वसमत, जि.हिंगोली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शेतकऱ्याचा झालेला मृत्यू

**(३७) * ५३९४७ श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वापटी (ता.वसमत,जि.हिंगोली) येथील एक शेतकरी प्राथमिक आरोग्य केंद्र, पांगराशिंदे येथे उपचारासाठी गेला असता तेथे वैद्यकीय अधिकारी नसल्याने वेळेत मदत मिळाली नसल्यामुळे त्याचा मृत्यू झाल्याची घटना माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) श्री.पांडूरंग नागोराव पानपट्टे यांचा शेतातील विहीरीत पडून मृत्यू झाल्याने त्यांचे शव विच्छेदनासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, पांगरशिंदे येथे आणण्यात आले असता तेथे दोन्ही वैद्यकीय अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे नजीकच्या प्राथमिक आरोग्य केंद्र, कुरुदा येथे शवविच्छेदन करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्र, पांगरशिंदे येथील दोन्ही वैद्यकीय अधिकाऱ्याविरुध्द प्रशासकीय कारवाई प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### मौ.सावरकुट (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे रस्ता नसल्याने वैद्यकीय उपचार वा दैनंदिन गरजांसाठी आदिवासी बांधवांची होत असलेली गैरसोय

**(३८) * ५०७६९ श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.सावरकुट (ता.शहापूर,जि.ठाणे) येथे रस्ता नसल्याने वैद्यकीय उपचार वा दैनंदिन गरजांसाठी तेथील आदिवासी बांधवांना दोन ते अडीच किलोमीटर पायी प्रवास करावा लागत असून डोंगरांवर चढउतार करीत शेजारील मोखाडा तालुक्यातील कोचाळे अथवा कसारा (रेल्वेस्टेशन) येथे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी रस्ता व कोणतीही वैद्यकीय सुविधा नसल्यामुळे मौ.सावरकुट येथील एका महिलेला प्रसुतीसाठी डोलीत बसवून अंधाऱ्या रस्त्यातून बॅटरी, छत्रीच्या सहाय्याने खोडाळा येथे प्राथमिक आरोग्य केंद्रात आणावे लागल्याचे दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू परिसरातील अनेक गावे ही दळणवळणाच्या सोईसुविधांपासून वंचित असल्याने तसेच अन्य गावातील वाडया-वस्त्यांपर्यंत रस्त्याचे बांधकाम तातडीने करण्याबाबत उक्त गावातील ग्रामस्थांनी शासनाकडे मागणी केली आहे , हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, तद्अनुषंगाने सदर गावात दळणवळणाच्या सोईसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
सावरकुट येथील एका महिलेला प्रसुतीसाठी २ ते ३ कि.मी. अंतर पायी प्रवास करुन त्यापुढे मध्य वैतरणा धरणाजवळून जीप या वाहनाने १६ कि.मी. अंतरावरील प्राथमिक आरोग्य केंद्र, खोडाळा (ता. मोखाडा) येथे नेण्यात आल्याचे जिल्हा परिषदेने कळविले आहे.
(३) व (४) सावरकुट वस्तीला जोडणारा दापूर ते सावरकुट हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.१८ दर्जाचा आहे. सद्य:स्थितीत सदरचा रस्ता पायवाट असून एकूण लांबी ३.९ कि.मी. आहे. त्यापैकी सुमारे १.४ कि.मी. लांबी खाजगी व २.५ कि.मी. लांबी वन विभागाची आहे.वनहद्दीतील जमीन अधिग्रहित करण्यासाठी व खाजगी जागा संबंधिताकडून बक्षिसपत्र/दानपत्र करणेसाठी आवश्यक कार्यवाही ग्रामपंचायत स्तरावर सुरु आहे.सदर रस्त्याच्या दुरुस्तीचा प्रस्ताव जिल्हा परिषदेद्वारे प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास प्रकल्प विभाग, शहापूर यांना सादर केलेला आहे. निधीच्या व जागेच्या उपलब्धतेनुसार सदर रस्त्याचे काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.सद्य:स्थितीत मौजे सावरकुट येथे प्राथमिक आरोग्य केंद्र कसारा, उपकेंद्र अजनुप व उपकेंद्र विहीगाव यांचे वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेविका व आशा कार्यकर्ती यांचेमार्फत वैद्यकीय सेवा नियमित देण्यात येत असल्याचे जिल्हा परिषदेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नर्सिंग महाविद्यालयातील शिक्षकांच्या प्रलंबित नियुक्त्या तत्काळ करणेबाबत

**(३९) * ५०३०१ श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय नर्सिंग महाविद्यालयात अध्यापनासाठी पाठ्यनिर्देशिका (ट्युटर) पदासाठी उपसंचालक आरोग्य सेवा मुंबई शुश्रूषांतर्गत दिनांक २८ फेब्रुवारी, २०२१ रोजी परीक्षा घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाठयनिर्देशिका या पदावर निवड होऊनही सरळसेवेने गुणवत्ता यादीत आलेल्या १५१ उमेदवारांना गेल्या तीन वर्षापासून अद्याप नियुक्त्या देण्यात आल्या नसल्याचे दिनांक २९ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पाठ्यनिदेशिकांना नियुक्त्या देण्याबाबत मॅट, मुंबई व मॅट,औरंगाबादने अंतिम निर्णय दिलेला असून मा.सार्वजनिक आरोग्यमंत्री, प्रधान सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग यांनीही आदेश देऊन सुध्दा सदर पाठयनिर्देशिका उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आलेल्या नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नियुक्त्या न देण्याप्रकरणी सदर उमेदवारांच्या संघटनेच्यावतीने मा.मुख्यमंत्री तसेच मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे तक्रार निवेदन देण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार पाठयनिदेशिका (ट्युटर) या पदावर निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

दि.०६.०६.२०२२ रोजीच्या मा. न्यायनिर्णयानुसार, गुणवत्ताधारक उमेदवारांना नियुक्ती देणेबाबत शासन पत्र क्र.न्यायिक २०१९/प्र.क्र.१००/सेवा५, दि.१७.१०.२०२२ नुसार मान्यता प्रदान करण्यात आली. त्यानुसार गुणवत्ता धारक उमेदवारांची समुपदेशन प्रक्रिया दि.१६.११.२०२२ रोजी आयुक्तालय स्तरावरुन पुर्ण होऊन पात्र ठरलेल्या एकूण ६२ (सर्वसाधारण प्रवर्गातील) उमेदवारांना नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

तसेच उर्वरीत उमेदवारांचे नियुक्तीबाबत कागदपत्रे संबंधीत प्राधिकरणाकडे पडताळणीस पाठविण्यात आलेले आहेत.
(४) होय, हे खरे आहे.
(५) सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ होते. या पदाच्या सरळसेवेच्या निकालानुसार गुणवत्ता यादी जाहीर होणे व न्यायनिर्णयाचा दिनांक यामध्ये एक वर्षाचा कालावधी झाल्याने विहीत शासन मान्यता घेवून समुपदेशन प्रक्रिया करण्यात आली.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील सर जे.जे. रुग्णालयातील बदली कामगारांना कायम सेवेमध्ये रुजू करण्याबाबत**

**(४०) * ४९५९९ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.संतोष दानवे (भोकरदन), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सर जे.जे. रुग्णालयात १२२ बदली कामगार असून यात ३० महिला कर्मचारी असून या कामगारांना कायमस्वरुपी सेवेत घेण्यासाठी औद्योगिक न्यायालयाने दिनांक २७ जुलै, २००३ रोजी आणि महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने (मॅट) दिनांक १४ फेब्रुवारी, २०२२ रोजी शासनाला आदेश देवूनही गेली २५ ते ३० वर्षे रूग्णसेवेत कार्यरत असलेल्या बदली कामगारांना कायमस्वरुपी सेवेत घेण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही रूग्णालय प्रशासन व संबधित विभाग करीत नसल्याचे माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सेंट जॉर्ज रुग्णालयातील बदली कामगारांना दिनांक २० जानेवारी, २००३ मध्ये औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार तेथील रुग्णालय प्रशासनाकडून बदली कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी सेवेत घेण्यात आले तथापि सर जे.जे. रुग्णालय प्रशासनाकडून याबाबत कोणतीही अंमलबजावणी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सर जे. जे. रुग्णालयातील बदली कामगारांना कायमस्वरूपी सेवेत घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही.

बदली कामगारांच्या संदर्भात विविध न्यायालयांनी दिलेले न्यायनिर्णय विचारात घेऊन तसेच, मा. सर्वोच्च न्यायालयाने उमादेवी विरुध्द कर्नाटक शासन या प्रकरणी दिलेले निर्देश विचारात घेऊन शासनाने एक वेळची बाब म्हणून पात्र बदली

कामगारांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेतला. त्यानुसार दि. ७.१२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये विभागाअंतर्गतच्या विविध संस्थांमधील ६२६ बदली कामगारांना शासन सेवेत सामावून घेण्यात आले. या धोरणानुसार अपात्र ठरलेल्या १२२ बदली कामगारांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात त्यांच्या सेवा नियमित करण्याकरीता मुळ अर्ज दाखल केला होता. सदर प्रकरणी मा. न्यायाधिकरणाने दि.१४.०२.२०२२ रोजी सेवा नियमित करण्याबाबत न्यायनिर्णय पारीत केला आहे. तथापि, मा. न्यायाधिकरणाचे सदर आदेश हे शासनाच्या धोरणाशी विपरीत असल्याने सदर आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. १०७९३/२०२२ अन्वये अपील दाखल करण्यात आले. याप्रकरणी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या आदेशास मा. उच्च न्यायालयाने दि. १४.९.२०२२ च्या आदेशान्वये स्थगिती दिली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(२) हे खरे नाही.

दि. ७.१२.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये एक वेळची बाब म्हणून बदली कामगारांच्या सेवा नियमित करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. त्यानुसार सर जे.जे. रुग्णालयातील पात्र ३२६ बदली कामगारांना शासकीय सेवेत सामावून घेण्यात आले आहे.

(३) सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील परिचारिकांच्या प्रलंबित मागण्याबाबत**

**(४१) ४९७९९ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व जिल्हा परिषदांतील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील परिचारिकांनी आपल्या प्रलंबित मागण्यांकरिता माहे ऑगस्ट,२०२२ मध्ये आझाद मैदानात बेमुदत आंदोलन केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना संसर्गाच्या काळामध्ये कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांना कायम न करता राज्यातील परिचारिकांची रिक्त पदे कायमस्वरुपी पध्दतीने भरण्याची मागणी उक्त आंदोलनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रलंबित मागण्यासाठी परिचारीकांनी यापुर्वी दिनांक १ ते ७ सप्टेंबर, २०२० तसेच दिनांक २१ ते २५ जून, २०२१ या कालावधीमध्ये राज्यव्यापी आंदोलन केले होते त्यावेळी त्यांच्या या मागण्या तत्वत: पुर्ण करण्याचा निर्णय शासनाने आंदोलक परिचारीकांना दिला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या निर्णयाच्या अनुषंगाने अद्याप अंमलबजावणी न करण्याची कारणे काय आहेत तसेच परिचारीकांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यामत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा परिषदातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेद्रातील परिचारीकांनी आंदोलन केले नसून उपकेंद्रातील अशंकालीन स्त्री परिचर यांनी आंदोलन केले होते.

(२) हे अंशत: खरे आहे.

अंशकालीन स्त्री परिचर हे पद कंत्राटी नसून आकृतीबंधानुसार अंशकालीन म्हणून मंजूर आहे.

(३)हे अंशत: खरे आहे.

अंशकालीन स्त्री परिचरांच्या मागण्याच्या अनुषंगाने दि.२०.१०.२०२० रोजी तात्कालीन मंत्री (आरोग्य) महोदयांकडे बैठक झाली होती. सदर बैठकीमध्ये मानधन वाढीचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश तात्कालीन मंत्री (आरोग्य) महोदयांनी दिले होते. सदर निर्देशाच्या अनुषंगाने मानधन वाढीबाबत प्रस्ताव पुनश्च वित्त विभागास पाठविण्यात आला होता. सदर प्रस्ताव वित्त विभागाने अमान्य केला आहे.

(४) तात्कालीन मा.राज्यमंत्री (आरोग्य) यांच्याकडे दि.०२.०५.२०१७ रोजी अंशकालीन स्त्री परिचर यांना रू.६०००/- प्रतिमहा मानधन वाढीचा प्रस्ताव दि.०६.०१.२०१७ च्या पत्रान्वये सादर करण्यात आला होता.सदर प्रकरणी शासन पत्र क्र.अंकाप २०१४ /मानधन /प्र.क्र३१३ /सेवा-५, दि.२०.११.२०१७ अन्वये राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या वेतन सुधारणाकरिता श्री.के.पी.बक्षी, अप्पर मुख्य सचिव (से.नि.) यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समितीच्या २०१७ च्या नियुक्ती केली. त्यामुळे श्रेणीवर्धन प्रस्ताव विचारात न घेण्याचा निर्णय वित्त विभागाच्या दि.१४.०८.२०१७ रोजीच्या परिपत्रकान्वये घेण्यात आला. तसेच एकाच विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत स्वतंत्रपण निर्णय न घेता सर्वच विभागातील नियम/एकत्रित वेतनावरील अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या संदर्भात समितीच्या शिफारशींनुसार निर्णय घेणे उचित राहील असे अभिप्राय वित्त विभागाने दिले होते.

राज्य वेतन सुधारण समितीने अशंकालीन कर्मचाऱ्यांच्या वेतनात सुधारणा करण्याच्या अनुषंगाने वित्त विभागाने दि.०१.०३.२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित केला असून अंशकालीन कर्मचाऱ्यांचे वेतन रू.१२०० वरून रु.३००० करण्यात आले आहे. पुनश्च सादर केलेला प्रस्ताव वित्त विभागाने अमान्य केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलने ऑनलाईन नोंदणी करुन घेतलेल्या नर्सेसची नेमणूक बोगस असल्याबाबत**

**(४२) * ४९६३६ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना संसर्गाच्या काळात नर्सेसची गरज निर्माण झाल्यामुळे महाराष्ट्र नर्सिंग परिषदेने नर्सिंगचा अभ्यासक्रम पास झालेल्यांना ऑनलाईन गुणपत्रिकेच्या आधारावर नोंदणी करुन घेतलेल्या ३७ हजार नर्सेसची प्रमाणपत्रे बोगस असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलच्या अध्यक्षांनी या प्रकरणी चौकशी करुन सदर ३७ हजार नर्सेसची नेमणूक बोगस पध्दतीने केली असल्याचा ठपका महाराष्ट्र नर्सिंग परिषदेच्या संबंधित रजिस्ट्रार यांच्यावर ठेवला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणामुळे रजिस्ट्रार यांनी राजीनामा दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्याकरिता शासनाने वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाचे सहसचिव यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ३ नोव्हेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास समिती नेमली असून सदर समितीने चौकशी करुन त्यांचा अहवाल सादर केला आहे काय,

(५) असल्यास, सदर चौकशीअंती दोषी असणाऱ्या सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) नाही.

(२) महाराष्ट्र परिचर्या परिषदेच्या अध्यक्षांनी ३७ हजार नर्सेसची नोंदणी बोगस पध्दतीने केली असल्याचा ठपका तत्कालिन प्रभारी प्रबंधक महाराष्ट्र परिचर्या परिषद यांच्यावर ठेवला आहे.

(३) नाही.

(४) शासनाने वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाचे सहसंचालक यांचे अध्यक्षतेखाली दि.१४ ऑक्टोंबर,२०२२ रोजी चौकशी समिती नेमली असून सदर समितीकडून चौकशी सुरू आहे.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोकडविरा (ता.उरण) येथील महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या वायू विद्युत केंद्रातील बॉयलरमध्ये झालेल्या स्फोटाबाबत

**(४३) * ४९५७४ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोकडवीरा (ता.उरण) ग्रामपंचायतीच्या हद्दीतील महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीच्या वायू विद्युत केंद्रातील (जीटीपीएस) वीज निर्मितीच्या युनिटमधील स्टीम बॉयलरमध्ये भीषण स्फोट झाल्याचे दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, या भीषण स्फोटात विद्युत निर्मिती कंपनीचे अभियंता विवेक धुमाळे यांचा मृत्यू होऊन अन्य दोन कामगार स्फोटामध्ये गंभीर जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच, मृत्यू व जखमी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.
सदरचा अपघात दि. ०९.१०.२०२२ रोजी उरण ए-२ युनीटमध्ये घडलेला नसून वायू विद्युत केंद्रामधील बी-२ झाला आहे. यात स्टीम बॉयलरचा स्फोट झालेला नसून बी-२ बॉयलरच्या बिसीपी पंपामध्ये बिघाड होऊन सदरची दुर्घटना घडली. त्यावेळी त्या क्षेत्रावर काम करत असलेल्या एक कनिष्ठ अभियंता, एक तंत्रज्ञ व एक कंत्राटी कामगार भाजले होते आणि तदनंतर उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
त्यावेळी क्षेत्रावर कार्यरत असलेले कनिष्ठ अभियंता श्री. विवेक धुमाळे, एक तंत्रज्ञ व एक कंत्राटी कामगार भाजले आणि तदनंतर उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले.
(३) सदर घटनेची चौकशी करण्यासाठी महानिर्मिती कंपनीच्या मुख्य कार्यालयाकडून उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापित करण्यात आली असून समितीकडून चौकशी करण्यात येत आहे. चौकशी अंती प्राप्त अहवालानुसार संबंधितांवर योग्य ती कारवाई नियोजित आहे.
(४) व (५) महानिर्मिती कंपनीच्या आस्थापनेवरील मृत व्यक्तींचे वारस हक्क प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर कुटुंबीयांना महानिर्मिती कंपनी मार्फत आर्थिक मदत देण्याचे नियोजित आहे. तसेच मृत कंत्राटी कामगाराच्या वारसास आर्थिक मदत देण्यात आली असून वारसास कंत्राटी तत्वावर नोकरी देण्यात आली आहे.

-----------------

**पोषण आहाराच्या दरात वाढ करण्याबाबत**

**(४४) * ५०४९४ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गर्भवती, स्तनदा मातांना व अति कुपोषित मुलांना प्रतिदिन प्रति लाभार्थी सकाळचा नाश्ता व दुपारचे जेवण केवळ ८ रुपयांत देण्याची शासनाची तरतूद असल्याने त्यात पोषण आहार देणे अंगणवाडी सेविकांना शक्य होत नसल्याचे नुकतचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व जीवनावश्यक खाद्य पदार्थांचे भाव व इंधन खर्च दुप्पटीने वाढलेला असतानाही पोषण आहाराच्या दरामध्ये कालानुरुप वाढ झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दर महागाईच्या प्रमाणात न वाढविल्यामुळे त्याचा परिणाम आहारावर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाने निश्चीत केलेल्या दरानुसार राज्यात ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके, गरोदर व स्तनदा माता व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील कुपोषित बालके यांना घरपोच आहार तसेच ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील बालके यांना गरम ताजा आहार चालू आहे.

पोषण आहाराकरिता केंद्र शासनाने निश्चीत केलेला दर खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | लाभार्थी गट | दर |
|---|---|---|
| १ | ६ महिने ते ६ वर्ष बालके | रु.८/- प्रति दिन प्रति लाभार्थी |
| २ | गरोदर महिला व स्तनदा माता | रु.९.५०/- प्रति दिन प्रति लाभार्थी |
| ३ | ६ महिने ते ६ वर्ष कुपोषित बालके | रु.१२/- प्रति दिन प्रति लाभार्थी |

(२) पोषण आहाराच्या दरामध्ये सन २०१७ नंतर वाढ झालेली नाही, हे खरे आहे.

(३) केंद्र शासनाने निश्चीत केलेल्या दरानुसार राज्यात ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके, गरोदर व स्तनदा माता व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील कुपोषित बालके यांना घरपोच आहार तसेच ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील बालके यांना गरम ताजा आहार चालू आहे.

(४) पोषण आहाराचे दर वाढविणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे. महागाईचा वेळो-वेळी आढावा घेऊन केंद्र शासनामार्फत पोषण आहाराचे दर निश्चित केले जातात. केंद्राने निश्चित केलेले दर सर्व राज्यांना समान असतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील बालगृहांमधील समस्यांबाबत**

**(४५) * ५०३०९ श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.निलेश लंके (पारनेर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ८५० बालगृहे (रिमांड होम) असून त्यामध्ये वेगवेगळ्या कारणांमुळे ठेवण्यात आलेल्या मुलांची संख्या एक हजारापेक्षा अधिक असून जे.जे. ॲक्टनुसार पुरक नियमावली तयार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक बालगृहांना अद्याप अनुदान मिळालेले नसून तेथे अनेक कर्मचारी व समुपदेशकांची पदे रिक्त असून केवळ कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील विशेषत: मुंबई, नाशिक, नागपूर, पुणे येथील बालगृहांमधून २६९ मुले-मुली पळून गेली असून त्यात मुंबई शहरातील संख्या जास्त असून सुमारे ५० मुलांचा मृत्यू झाल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, शासनाने माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०२२ मध्ये याबाबत एक समिती स्थापन केली असून समितीचा अहवाल अद्यापही सादर झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अशा प्रकरणांचे अहवाल जिल्हा विधी प्राधिकरण तसेच मानवाधिकार आयोगाकडे सादर करण्याबात शासनाची भूमिका काय आहे,

(६) असल्यास, शासनाने या बालगृहांची चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) हे अंशत: खरे आहे,

राज्यात बालकांची काळजी व संरक्षण घेणाऱ्या एकूण ४८६ शासकीय तसेच स्वयंसेवी संस्थांना मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी एकूण १५ शासकीय तसेच ३७ स्वयंसेवी निरीक्षणगृहे कार्यरत असून त्यामध्ये सद्यस्थितीत १०११ इतके प्रवेशित दाखल असून त्यांची मंजूर प्रवेशित क्षमता २६५९ इतकी आहे. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अन्वये महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ तयार करण्यात आले आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे,

राज्यातील बालगृहांचे ₹१४.१० कोटी इतके प्रलंबित अनुज्ञेय अनुदान देण्यात आले असून बालगृहाचे उर्वरित प्रलंबित अनुज्ञेय अनुदान अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे. राज्यातील शासकीय बालगृहे व निरीक्षणगृहांमध्ये

समुपदेशकांची काही पदे रिक्त असून सदर पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे व अशासकीय/स्वयंसेवी निरीक्षणगृहातील समुपदेशकांची पदे ही कंत्राटी पदे असून ती देखील भरण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) संस्थांमध्ये मृत्यू झालेल्या बालकांच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग यांचेकडे दिनांक १७ नोव्हेंबर, २०२२ रोजी सुनावणी झालेली असून सदर सुनावणीमध्ये विभागामार्फत सविस्तर अहवाल सादर करण्यात आलेला आहे.
(६) याबाबत ज्या संस्थांमध्ये प्रवेशितांचा मृत्यूच्या घटना घडलेल्या आहेत त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच सदर प्रकरणी काही दोषी कर्मचाऱ्यांचे निलंबन देखील करण्यात आले आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हयातील रुग्णालयांमध्ये आरोग्य सोयी-सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(४६) * ४९६८८ अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हयात अनेक वाडी-वस्त्यांमध्ये अद्यापही प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रमीण रुग्णालयात अत्याधुनिक सुविधा, तज्ञ डॉक्टर, डायग्नोस्टिक सेंटर, औषधे अशा सुविधा उपलब्ध नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मनोर-कुर्झे (जि.पालघर) गावातील कु.प्रताप महेश तांबडे या साडेपाच वर्षीय बालकाचा सर्पदंशामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रात वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे मृत्यू झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हयात सर्पदंशाने अनेकांचे मृत्यू झाले असूनही अद्यापपर्यंत बहुतेक रुग्णालयांत सर्पदंशावर योग्य उपचार मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पालघर जिल्हयातील नागरिकांसाठीअद्यावत आरोग्य सोयी-सुविधा तातडीने पुरविण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.
पालघर जिल्ह्यामध्ये ०९ ग्रामीण रुग्णालये, ४६ प्राथमिक आरोग्य केंद्र, ०१ जिल्हा परिषद दवाखाना, ०३ प्राथमिक आरोग्य पथके व ०७ भरारी पथके कार्यरत आहेत. सदर आरोग्य संस्थेमध्ये निकषाप्रमाणे वैद्यकीय अधिकारी व तज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करण्यात येते. सदर आरोग्य संस्थामध्ये आवश्यक ती सोयी सुविधा उपलब्ध असून त्यामार्फत आवश्यक त्या आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात.
(२) हे खरे नाही.
कु. प्रताप महेश तांबडे या साडेपाच वर्षीय बालकाला प्राथमिक आरोग्य केंद्र, कुर्झे येथे दिनांक २०.१०.२०२२ रोजी ११.५८ वाजता आणले असता कानाला काहीतरी चावले असल्याचे सांगण्यात आले. त्यानुसार सदर रुग्णावर तात्काळ प्राथमिक उपचार करुन ग्रामीण रुग्णालय, विक्रमगड येथे संदर्भित करण्यात आले. ग्रामीण रुग्णालय येथे रुग्णाची तपासणी व चाचणी करण्यात आली, चाचणीमध्ये न्यूरोटॉक्झिक प्रकारचा अतिविषारी संर्पदंश झाल्याचे लक्षात आले. त्यानुसार आवश्यक औषधोपचार ( inj ASV, inj Atropin, inj Neostigamin) देऊन उपजिल्हा रुग्णालय, जव्हार येथे संदर्भित करण्यात आले. उपजिल्हा रुग्णालय, जव्हार येथे कर्तव्यावर असलेले बालरोग तज्ञ यांनी तात्काळ intubate करुन रुग्णांस कृत्रिम श्वसन यंत्रणेवर ठेवून आवश्यक ते उपचार केले. रुग्णाची परिस्थिती गंभीर असल्याने आवश्यक प्रतिसाद मिळाला नाही व सदर बालकाचा रात्री ०३ वाजता उपचारादरम्यान मृत्यू झाला.

(३) हे खरे नाही.
पालघर जिल्ह्यातील कार्यरत असलेल्या सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालयामध्ये आवश्यक असलेले ASV औषध उपलब्ध आहे. तसेच सर्व ठिकाणी उपचार करण्यासाठी वैद्यकीय अधिकारी  इतर सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

तसेच उपजिल्हे रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये येथे सन २०२१-२०२२ मध्ये सर्पदंशावरील २३९१ रुग्णावर व सन २०२२-२०२३ (माहे ऑक्टोबर, २०२२ पर्यंत) मध्ये २२३३ सर्पदंशावरील रुग्णावर उपचार करण्यात आले.
तसेच जिल्हा परिषद यांच्या अधिपत्याखालील ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सन २०२१-२०२२ मध्ये सर्पदंशावरील २०१८ रुग्णांवर व सन २०२२-२०२३ मध्ये १५८६ रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत.
(४) जिल्ह्यामध्ये ०३ उपजिल्हे रुग्णालये, ०९ ग्रामीण रुग्णालये, ४६ प्राथमिक आरोग्य केंद्र, ०१ जिल्हा परिषद दवाखाना, ०३ प्राथमिक आरोग्य पथके व ०७ भरारी पथके कार्यरत आहेत. सदर आरोग्य संस्थामध्ये आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध असून त्यामार्फत आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.